MAHMARI 19358/13/1/2000 - TC

विद्या प्रसारक मंडळ
स्थापना • नौपाडा ठाणे • १९३५

व्ही.पी.एम्.
# दिशा

वर्ष सत्ताविसावे / अंक १ / जानेवारी २०२६

## संपादकीय

### रामानुजन स्मारकाला भेट

रामानुजन हे एक महान भारतीय गणिततज्ज्ञ होते. ब्रिटिश प्राध्यापक जी. एच. हार्डी यांच्या सहकार्याने त्यांनी अनेक गणितीय समीकरणे आणि सिद्धांत मांडले. अवघ्या ३२ वर्षांच्या कालावधीत त्यांनी आभाळाएवढे काम करून ठेवले आहे. जगातील मोजक्या गणिततज्ज्ञांमध्ये त्यांचा समावेश होतो. या महान गणिततज्ज्ञाचा जन्म त्यांच्या आईच्या माहेरी तमिळनाडू राज्यातील इरोड या गावी झाला. व्यवसायाच्या निमित्ताने त्यांचे वडील तमिळनाडू राज्यातील कुंभकोणम या गावी राहात असत. तिथेच त्यांचे बालपण गेले. आपले शालेय शिक्षण त्यांनी याच गावात राहून पूर्ण केले. पुढे ते नोकरीच्या निमित्ताने मद्रासला राहायला गेले. तिथून ते केंब्रिजला गेले. १९१९ मध्ये आजारी अवस्थेत ते भारतात परत आले. त्यानंतर त्यांच्या मृत्यूपर्यंत ते याच गावात राहिले. त्यांनी केलेल्या महान कामामुळे ते ज्या घरी राहात असत त्या घराला विशेष महत्त्व प्राप्त झाले. हे ठिकाण 'जागतिक स्मारक' व्हावे अशी अनेक गणितप्रेमी लोकांची इच्छा होती. त्यामध्ये भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांचादेखील समावेश होता. त्यांनी पुढाकार घेऊन तमिळनाडू राज्यातील शास्त्र विद्यापीठाकडे हे काम सोपवले. रामानुजन यांच्या मृत्यूनंतर त्यांची पत्नी त्या घरात राहात होती. तिच्या निधनानंतर हे घर दुसऱ्याच व्यक्तीच्या ताब्यात गेले. शास्त्र विद्यापीठाच्या अधिकाऱ्यांनी ते घर मिळविले, त्याची थोडी डागडुजी केली आणि त्या घराचे स्मारकात रूपांतर केले. 'रामानुजन यांचे आंतरराष्ट्रीय स्मारक' असे त्याचे नामकरण करण्यात आले. या स्मारकाचे उद्घाटन २० डिसेंबर २००३ रोजी डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्याच हस्ते करण्यात आले.

२०२६ च्या जानेवारी महिन्यात गणित शिक्षणावरील एका आंतरराष्ट्रीय परिषदेत सहभागी होण्यासाठी मला तमिळनाडू राज्यातील तिरूचिरापल्ली या गावी जाण्याचा योग आला. तिथे गेल्यावर असे कळले की, कुंभकोणम हे गाव तिथून जवळच आहे. माझ्यासोबत इस्राएलमधून आलेले दोन शिक्षणतज्ज्ञ होते. त्यांच्याकडे रामानुजन स्मारकाला भेट देण्याची माझी इच्छा मी व्यक्त केली. त्यांना रामानुजन या व्यक्तीबद्दल प्रचंड आदर असल्याने त्यांनी लगेच होकार दिला. एक टॅक्सी ठरवून आम्ही तिघे कुंभकोणमला पोहोचलो. कुंभकोणम हे शहर तसे लहानच आहे. एकोणिसाव्या शतकात ते आणखीच लहान असावे. या गावातील एका कापड दुकानात रामानुजन यांचे वडील कामाला होते.

(मुखपृष्ठ क्र. २ वर)

(मुखपृष्ठावरून - **संपादकीय**)

दुकानाजवळच एका चाळवजा घरात ते राहात असत. या घराचे मूळ स्वरूप अजूनही कायम ठेवण्यात आले आहे. आजूबाजूला असलेल्या चाळी तोडून तिथे मोठ्या इमारती उभ्या करण्यात आल्या आहेत. कुंभकोणम हे 'मंदिरांचे शहर' म्हणून ओळखले जाते. या लहानशा शहरात शिव आणि विष्णू यांना समर्पित अनेक प्राचीन मंदिरे आहेत. यात कुंभेश्वर स्वामी मंदिर, चक्रपाणी मंदिर, काशी विश्वनाथ मंदिर, सारंगपाणी मंदिर, ऐरावतेश्वर मंदिर, स्वामीमलाई मंदिर अशा अनेक मंदिरांचा समावेश होतो. त्यातील सारंगपाणी मंदिराजवळ रामानुजन यांचे घर आहे. मंदिराजवळ पोहोचताच एका अरूंद अशा रस्त्याने पुढे जावे लागते. रस्त्यावर स्मारकाची मोठी पाटी असेल असे वाटले होते. परंतु तसे काहीच आढळले नाही. रस्त्याच्या दोन्ही बाजूला लहान लहान दुकाने आहेत. त्यामुळे रस्त्यावर सतत वर्दळ असते. त्यातील एका व्यक्तीकडे विचारणा करून आम्ही स्मारक-स्थानी पोहोचलो.

'रामानुजन स्मारक' हे कौलारू छप्पर असलेले चाळीतले एक घर आहे. घराच्या प्रवेशद्वाराजवळ स्मारकाची पाटी असून, त्यावर उद्‌घाटनाची तारीख स्पष्टपणे लिहिली आहे. घराच्या भिंती मातीच्या असून, घरात तीन खोल्या आहेत. शयनगृह, बैठक आणि स्वयंपाकघर अशी त्यांची विभागणी करता येते. शयनगृह आणि स्वयंपाकघर आहे तसेच ठेवले आहे. बैठकीच्या खोलीला सजविण्यात आले आहे. यात मध्यभागी रामानुजन यांचा लहानसा पुतळा आहे. त्याच्या पाठीमागे असलेल्या भिंतीवर छापील कागद लावलेले आहेत. त्यामध्ये रामानुजन यांची वेगवेगळ्या वेळेस घेतलेली छायाचित्रे आहेत. काही चित्रांमध्ये त्यांनी निर्माण केलेली सूत्रे आहेत. रामानुजन यांना गणितीय कोडी बनविण्याची आवड होती. त्यातील काही कोडी तिथे प्रदर्शित केली आहेत. त्यात सगळ्यांत उठून दिसते ते त्यांच्या जन्म तारखेचे कोडे.

स्मारकाला भेट देऊन बाहेर पडताना आमच्या मनात मिश्र भावना होत्या. एका महत्त्वाच्या ठिकाणाला भेट दिल्याचा आनंद होता. त्याचबरोबर या स्मारकाला आणखी सजवता आले असते असेही आम्हाला वाटले. रामानुजन यांनी लिहिलेली आणि त्यांच्याबद्दल माहिती देणारी विपुल अशी ग्रंथसंपदा उपलब्ध आहे. त्यातील काही ग्रंथ येथे ठेवले असते तर अधिक बरे झाले असते. चौकशी केली असता असे कळले की, रामानुजन यांच्या नावाने एक स्वतंत्र वाचनालय मद्रास शहरात उभारलेले आहे. मद्रासला कधी जाणे झाले तर या ग्रंथालयाला नक्की भेट द्यायची असा मी निश्चय केला. ते होईल तेव्हा होईल! परंतु आजचा दिवस कामी लागला याचे समाधान आमच्या तिघांच्याही चेहऱ्यावर दिसत होते. शास्त्र विद्यापीठाने स्मारक निटनेटके ठेवले आहे. रोड झाडलोट करून रांगोळी घालण्यासाठी एका महिलेची नेमणूक केलेली आहे. त्याचबरोबर स्मारकाची देखभाल करण्यासाठी आणि माहिती देण्यासाठी एका चौकीदाराची नेमणूक केलेली आहे. या स्मारकाला भेट देणाऱ्या लोकांची संख्या फारच कमी आहे असे कळले. स्थानिक लोकांना या स्मारकाचे फारसे महत्त्व नाही. परंतु गणिताची आवड असलेले लोक लांब अंतरावरून या स्मारकाला भेट द्यायला येतात असे तेथील चौकीदाराने सांगितले. काही का असेना; या ठिकाणाला भेट देण्याचा अनुभव खरोखरच प्रेरणादायी असाच होता !

**- डॉ. सुधाकर आगरकर**

●●●

व्ही.पी.एम्.

# दिशा

वर्ष सत्ताविसावे/अंक ७/जानेवारी २०२६

**संपादक**
डॉ. विजय बेडेकर

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष ३० वे/अंक ७ वा)

**कार्यालय/पत्रव्यवहार**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्या मंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
**दूरध्वनी : २५४२ ६२७०**
**www.vpmthane.org**
**vpmt1935@gmail.com**

**मुद्रणस्थळ :**
परफेक्ट प्रिण्टस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
**दूरध्वनी : ९१५२४८७७६५**
**Email:perfectprints@gmail.com**

## *अनुक्रमणिका*

| | | | |
|---|---|---|---|
| १) | संपादकीय | डॉ. सुधाकर आगरकर | |
| २) | जागतिक वारसा स्थळ नामांकित गड किल्ल्यांचा परिचय किल्ले तोरणा | दिलीप नारायण वंडलकर | ३ |
| ३) | पिढी घडविणारा विद्वान कार्यकर्ता : डॉ. अशोकराव मोडक | जयंत कुलकर्णी | ६ |
| ४) | उंटांची अद्भूत रम्य दुनिया २०२४ हे आंतरराष्ट्रीय कॅमेलीड्सचे वर्ष | सौ. अल्पना बापट | १२ |
| ५) | सिनेमा, सेन्सॉर बोर्ड आणि न्यायालये | प्रा. विनोद एच. वाघ | १७ |
| ६) | चित्रकार दीनानाथ दलाल : चित्र आणि चरित्र | चन्द्रशेखर टिळक | २१ |
| ७) | परिसर वार्ता | संकलित | २४ |

या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून, त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# व्ही. पी. एम. 'दिशा'च्या संदर्भात

- आपण 'दिशा' नियमित वाचा. इतरांनाही वाचायला सांगा.
- हे व्यासपीठ **अभ्यासपूर्ण लेखांसाठी** आहे.
- शैक्षणिक संस्थेने असे मासिक चालवावे, याचे हे एकमेव उदाहरण आहे.
- आपण विचारप्रवृत्त लेख पाठवून 'दिशा'ला सहकार्य करू शकता.
- आपण स्वत: देणगी मूल्य देऊ शकता व इतरांना सांगा.
- आपले देणगी मूल्य द्यायचे राहिले नाही ना, कृपया पडताळून पाहा.
- दिशाच्या संदर्भात देणगी मूल्य, लेख पाठवावयाचे असतील तर ते कार्यवाह, विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, नौपाडा, ठाणे - ४००६०२ या पत्त्यावर पाठवा. ०२२-२५४२६२७० या क्रमांकावर संपर्क साधा.
  Email : vpmt1935@gmail.com
- आपण सार्वजनिक ग्रंथालयाचे संचालक असाल वा असे एखादे ग्रंथालय चालवत असाल, तर आपण सभासद होणे अत्यंत गरजेचे आहे. महाविद्यालये, शाळा यांच्या प्रमुखांनीही आपल्या संस्थेकडून देणगीमूल्य पाठवावे.
- www.vpmthane.org या संकेतस्थळावर 'दिशा'चे जुने अंक आपण पाहू शकता.
- वार्षिक देणगी मूल्याचा रु. ५००/- चा धनादेश 'विद्या प्रसारक मंडळ' या नावाने पाठवावा.
- कृपया वर्गणीदार व्हावे.

- संपादक

# जागतिक वारसा स्थळ नामांकित गड किल्ल्यांचा परिचय
# किल्ले तोरणा

*शिवबाराजेंनी त्यांच्या सवंगड्यांसह रोहिडेश्वराच्या मंदिरात हिंदवी स्वराज्याच्या स्थापनेसाठी बेलभंडारा उचलत शपथ घेतली आणि त्या आराध्याच्या रक्षणार्थ रोहिडेश्वराचा किल्लासुद्धा ताब्यात घेतला. परंतु खऱ्या अर्थाने स्वराज्याची मुहूर्तमेढ रोवली ती तोरणागड ताब्यात घेऊन ! नुकताच या किल्ल्यास युनेस्कोच्या जागतिक वारसा स्थळ यादीत स्थान मिळाले आहे. त्याचीच माहिती या लेखात देण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.– संपादक*

**तोरणा किल्ला**




शिवबाराजेंना बंगलोरहून पुण्यास येऊन आता उणीपुरी दोन–तीन वर्षे झाली होती. या काळात त्यांनी दादोजींसोबत अख्खा पुणे प्रांत पिंजून काढत कष्टकरी, शेतकरी आणि इतरांच्या समस्या जाणून घेत, त्यावरील उपाय कसे असावेत याचे ज्ञान आत्मसात करून घेतले. त्यानंतर त्यांनी स्वतंत्रपणे जहागिरीच्या कामात लक्ष देण्यास सुरुवात केली. रांझ्याच्या पाटलास त्याने केलेल्या गैरकृत्याची शिक्षा म्हणून हातपाय तोडण्याची कृती हे त्याचेच एक उदाहरण आहे. पुढे नाचणीच्या येसाजी कंकाच्या घरी थांबले असता गावकऱ्यांनी मनोहारी नामक बारा–तेरा वर्षांच्या आणि रेखीव सौंदर्याने नटलेल्या मुलीस आणून उभे केले व सांगू लागले, ‘या अनाथ मुलीस मनपसंद गडाच्या मुसलमान किल्लेदाराने त्याच्या जनानखान्यात रवानगी करण्याचा हुकूम जारी केला असून ही बातमी मिळताच आम्ही गुपचूप हिला खाली आणले आहे, राजांच्या तोंडून तात्काळ शब्द बाहेर पडले, ‘तुम्ही मांसाहेंबाकडे हिला घेऊन जा. त्या सारे पाहतील. हिंदूची पोर अनाथ झाली म्हणून ती




**किल्ले तोरणा/प्रचंडगड**

जनानखान्यात जावी, असं व्हायचं नाही’ तिकडे दादोजींनी हुकूम जारी केला, ‘जो कोणी हिंस्र श्वापदाची शेपटी दफ्तरी जमा करेल, त्यास दोन होन बक्षीस’ या व अशा निर्णयांनी शिवबांची ‘रयतेचा राजा’ अशी प्रतिमा तयार झाली. त्यातून शिवबांच्या चाहत्यांची गर्दी वाढू लागली. त्यात गुंजवण्याचे येसाजी कंक होते; मोसे खोऱ्यातील बाजी पासलकर, नऱ्हेकरांचे बाळाजी चिमणाजी होते. कावजी कोंढाळकर, जिवा महाला, वाघोजी तुपे, सूर्याजी काकडे, नेताजी, तानाजी हळूच जुळले. दादाजी नरसप्रभू तर अलीकडे शिवबांना सावलीसारखे चिकटून राहू लागले. देशमुख, देशपांडे तर राजांचे दोन शब्द ऐकण्यासाठी आतूर दिसायचे. अशा जिवलगांच्या साथीने राजे आता स्वतंत्रपणे फेरफटक्याला जाऊ लागले. पूर्वी टापांचा आवाज ऐकताच ‘मोगल आले’ समजून रानाचा निवारा शोधणारी माणसे आता टापांचा आवाज कानी पडताच ‘राजे आले’ समजून धावत आडवी येत होती. दिवसागणिक माणसं

वाढत होती. एव्हाना ब्राह्मण, मराठे, महार, रामोशी प्रभू आदी अठरापगड जातीचे लोक शिवबांना जुळत असल्याचे दिसू लागले. राजांभोवती पिताश्रींचे शब्द पिंगा घालत म्हणू लागले, ''घनदाट अरण्यांतून, डोंगर-दऱ्यांतून आणि नदीनाल्यांतून जो स्वत:ची वाट निर्माण करतो त्यालाच 'नेता' म्हणतात. त्याने एकदा पायवाट तयार केली की बाकीचे तिच्यावर चालतात आणि रस्ता तयार होतो.''




एकदा शिवबाराजे असेच निवडक सवंगड्यांसह रोहिडेश्वराच्या मंदिरात पोहोचले. तिथे त्या सर्वांनी अनुभवली- नि:शब्द शांतता ! नीरव मात्र नव्हे; कारण वाऱ्याची सळसळ, कुणा जनावरांच्या पावलांनी होणारी पाचोळ्याची खसपस आणि जनावरांचेच क्वचित उमटणारे चित्कार, फिस्कारणे, भुंकणे, गुरगुरणे, सुस्कारणे, केकाटणे इत्यादी आवाज आणि त्यांचाच संचार ! पालापाचोळा इतस्तत: पसरलेला आणि त्यातच उभे असलेले ते रोहिडेश्वराचे मोडकळीस आलेले, भेगाळलेले आणि भिंतीच्या दगडांनी एकमेकांशी सख्य सोडलेले मंदिर! अशा त्या विषण्णावस्थेत शिवबांच्या मुखातून उत्स्फूर्त शब्द उमटले, 'जिथे आपल्या देवांची ही स्थिती, तिथे आमच्या आया-बहिणींची काय अवस्था असणार ! आपण कष्ट करायचे, मरमर मरायचे.. ते कुणासाठी? आता मार्ग एकच; परकीय सत्तेला हद्दपार करायचेच.' वातावरण अकस्मात गरम झाले. त्यातच साठी पार केलेले बाजी पासलकर बोलले, 'शिवबाराजे, आज तू एक भव्य स्वप्न बघितलंस. आम्हालाही ते भावलं. इतरांनाही ते आवडेलच. तू पुढे हो, तुझ्या पाठीशी आम्ही आहोतच. मराठासुद्धा राज्य निर्माण करू शकतो हे दाखवूनच द्यायचे' सर्वतोमुखी यास दुजोरा मिळाला. उपस्थित सगळ्यांच्याच चेहऱ्यावर चैतन्य उमटले. मंदिर परिसर झाडून साफ करण्यात आला. महादेवाच्या पिंडीवर जलाभिषेक झाला. प्रत्येकाने भक्तिभावे पूजा बांधून स्वतंत्र राज्य निर्मितीसाठी बेलभंडारा उचलत 'हर हर महादेवा'च्या घोषात शपथ घेतली.

शिवबाराजांनी पुढचा मनसुबा सांगितला. त्यानुसार रोहिडेश्वराचा किल्ला ताब्यात घेऊन, देवाची जागा कब्जात आणण्याचे ठरले. मावळ्यांपैकी सुभान्याची मामी गडावर वस्तीस होती. तिच्याकडे राहून तो आतील बित्तंबातमी राजांना पुरवू लागला. पावसाळा तोंडावर आल्याने घरांची शाकारणी करण्यासाठी किल्लेदारांने भारेवाहकांना गडावर येण्याची परवानगी दिली. त्याचाच फायदा घेत पहिल्या दिवशी काही मावळ्यांनी भारेवाहकांच्या वेषात किल्ल्यात प्रवेश मिळवला. दुसरा दिवस उजाडला. पहाटेच्या सुमारास खुद्द शिवबाराजांनी खाशा मंडळीसोबत हत्यारबंद अवस्थेत लग्नाच्या बोलणीच्या निमित्ताने विनासायास गडात प्रवेश केला. त्या दिवशी भारेवाहकांची संख्या जरा जास्तच दिसू लागली. पहारेकऱ्यांना संशय येताच त्यांनी भारे उघडे करण्याचा हट्ट केला. तोपर्यंत बहुतेक मावळे गडावर दाखल झालेले असल्याने त्या भारेवाहकाने देवडीवर भारा सोडण्याच्या निमित्ताने खाली वाकत जोराने शिळ काढली आणि तलवारीने पहारेकऱ्यावर घाव घातला. शिळ ऐकून पुढे गेलेले भारेकरी परत आले आणि काही कळायच्या आत देवडीवरील इतरांना कापून काढत मुख्य दारावर कब्जा मिळवला. इतर मावळ्यांनी हुशार झालेल्या सैनिकांना एकतर पकडले किंवा यमसदनास धाडले. किल्लेदाराला पकडून बुरुजावर उभे असलेल्या शिवबाराजेंसमोर हजर केले. त्याने अरेरावीची भाषा करताच, शिवबांनी त्याला तोफेच्या तोंडी देण्याचाच हुकूम सोडला. मात्रा बरोबर लागू पडली. घाबरून

किल्लेदार शरण आला. त्याला इतमानाने कैदेत डांबण्यात आले. उरलेल्या बायाबापड्यांना अभय दिले. राजेंनी आदिलशाही हिरवा झेंडा उतरवून विजारीतून भगवा ध्वज काढून तो दिमाखात फडकवला. उपस्थित सगळ्यांनी 'हर हर महादेवा'च्या घोषात या घटनेचे उत्स्फूर्त स्वागत केले. एकच जल्लोष उडाला. 'स्वराज्याचा श्रीगणेशा' असा उत्साहात पार पडला (इ.स.१६४५)

आता राजेंचे लक्ष तोरणागडाकडे वळले. आकाशाला भिडलेला, चढायला कठीण पण संपूर्ण दुर्लक्षित असलेला किल्लेदार गाफिल... थोडक्यात 'आओ जाओ घर तुम्हारा' अशी परिस्थिती. शिवबांच्या मावळ्यांनी शोधून ठेवलेल्या चोरवाटांनी किल्ल्यात प्रवेश केला आणि गड ताब्यात घेतला. स्वतंत्र राज्यास तोरण्याच्या निमित्ताने 'नवे तोरण' बांधण्यास मिळाले. ही बातमी बांदलच्या देशमुखांनी शिरवळचा ठाणदार अमीन यास दिली. त्याने तातडीने विजापूर दरबारी शिवबांच्या बंडाळीचे वृत्त कळविले. शिवबाराजांनी रोहिडेश्वर आणि तोरणा गडाच्या तटबंदी दुरुस्तीचे काम हाती घेतले. तोरण्याचा प्रचंड विस्तार बघून राजेंनी तोरण्यास नवे नांव दिले 'प्रचंडगड'. तटबंदी मजबूतीचे काम सुरू असतांनाच गडावर गुप्त खजिना सापडला. तानाजीने ही बातमी टाकोटाक शिवबाराजेंना पुणे मुक्कामी दिली. खजिना लालमहाली आणण्यात आला. रोहिडेश्वर आणि तोरण्याच्या नवीन बांधकामात भेडसावणारी ददात संपली. राणीवसा, सदर आणि स्नेहीजनांत एकच आनंद उसळला. मांसाहेबांनी यास महादेवाचा व आई जगदंबेचा आशीर्वाद मानला. आदिलशाहीचा फास केव्हाही पडणार हे जाणून शिवबा प्रत्यक्ष तोरण्यावर जाऊन देखरेख करू लागले आणि किल्ल्याचे बांधकाम पूर्णत्वास नेले.

आजच्या घटकेला पुणे जिल्ह्यातील तोरणा हा सर्वांत उंच गड. समुद्र सपाटीपासून याची उंची ४६०६ फूट आहे. कमद खोऱ्यात म्हणजेच आनंदी नदीजवळ तोरणा उभा आहे. याच्या अंगावर 'तोरणा' नावाची झाडे पुष्कळ असावीत, म्हणून याचे नांव पडले 'तोरणा'. वेल्हे या गडाच्या पायथ्याशी असलेल्या गावापासून याची चढण सुरू होते. एका बाजूने उंचच उंच ताशीव कडा, तर दुसऱ्या बाजूस पाताळावरी गेलेली खोल दरी आणि या दोहोंच्या मधून सरळ वर चढणारी-कधी पायऱ्यांची, तर कधी दगडधोंड्यांतून जाणारी वळणावळणाची अरुंद वाट. शेवटी तर फक्त लोखंडी कांबींना पकडूनच वाटचाल करावी लागते. थोडक्यात; पुणे दरवाज्यापर्यंत (बिनीचा दरवाजा) पोहोचता-पोहोचता आपलीच वाट लागते. शिवबांचा होरा असा की, शत्रू कधी या वाटेने आलाच तर इथपर्यंत येईस्तोवर तो अर्धमेला झालाच पाहिजे. या दरवाजातून आणखी थोडे उंच चढून पुढे गेलो की 'कोठी दरवाजा' येतो. तो ओलांडला की गडात प्रवेश होतो. आत गेल्यावर डाव्या बाजूलाच घुमटी आहे. तीत या गडाची देवता 'तोरणाजईची मूर्ती' आहे. गडावर विसाव्याचे एकच ठिकाण आहे, ते म्हणजे 'मेंगईदेवीचे मंदिर'. आसमंतात तोरण टाके, खोकड टाके व 'तोरणेश्वर महादेवाची घुमटी' आहे. शिवाय दिवाणघर, दीपमाळ, ढालकाठी, सदर, कचेरीची इमारत असे अनेक अवशेष बघायला मिळतात.

गडाचा खरा राकटपणा आपल्याला पूर्वेकडील झुंजार व पश्चिमेकडील 'बुधला माची' बघून लक्षात येतो. पैकी 'झुंजारमाची' लांबीला कमी असली, तरी तीवर उतरणे अती कठीण आणि माचीवरून गडाखाली उतरणे त्याहून कठीण! बहुधा त्यामुळेच या माचीला 'झुंजार' असे नांव पडले असावे. पश्चिमेकडील माचीवर तेलाचा बुधला उपडा ठेवावा तसा दिसणारा प्रचंड सुळका आहे. म्हणून त्याला 'बुधला माची' असे म्हणतात. या माचीतच 'कोंकण दरवाजा' आहे. या बुधल्याजवळूनच 'संजीवनी माची' मार्गे राजगडावर जाता येते. शिवबाराजेंनी या दोन्ही माच्यांवर चौक्या-पहारे बसविले मेटे, बांधली. शिवबाराजे व मोगल सरदार मिर्झाराजे जयसिंह यांच्यात जो तह झाला, त्याप्रमाणे तेवीस किल्ले मोगलांना दिले व बारा किल्ले स्वतःकडे

(पृष्ठ क्र. २३ वर)

# पिढी घडविणारा विद्वान कार्यकर्ता : डॉ. अशोकराव मोडक

*ज्येष्ठ अभ्यासक तत्त्वज्ञ व मुंबई विद्यापीठातील राज्यशास्त्राचे माजी प्राध्यापक डॉक्टर अशोकराव मोडक यांचं दिनांक २ जानेवारी २०२० रोजी निधन झालं. त्यांच्या कार्याचा आढावा घेणारा लेख – संपादक*



पणजीमधील आमच्या नव्या कार्यालयाच्या पत्त्यावर आलेले ते बहुधा पहिलेच पत्र असावे. छानदार अक्षरात पत्ता लिहिलेले फिकट निळ्या रंगाचे आंतरदेशीय पत्र. मला त्याचीच प्रतिक्षा होती. उत्सुकतेने मी पत्र उघडले आणि वाचले. थोडी निराशाच पदरी पडली. पत्र सरळ घडी केले आणि माझ्या बॅगेत ठेवून दिले. मी विचारलेल्या व्यावहारिक प्रश्नांना उत्तर म्हणून अशोकरावांनी थेट मला भगवद्गीतेतील एक श्लोक पाठवून त्याचे संक्षिप्त निरूपणच केले होते!

'स्वकर्मणा तमभ्यर्च्य सिद्धिं विन्दति मानवः' या भगवद्गीतेतील १८व्या अध्यायातील श्लोकाने सुरुवात केलेले सरांच्या सुवाच्य अक्षरातील ते पत्र डोळ्यांपुढे अगदी आजही लख्ख उभे राहते !

'आपण कोणतेही काम करत असू – मोठे असो वा लहान – ते जर पूर्ण निष्ठेने, भक्तिभावाने आणि समर्पण भावनेने केले, तर तेच ध्येयप्राप्तीचे साधन ठरते. कोणतेही कार्य तुच्छ नाही; तेच ईश्वरसेवेचे साधन आहे.' अशा आशयाच्या त्या पत्राने मी तेंव्हा खट्टू झालो खरा; पण खरे तर आजपर्यंतच्या वाटचालीत कितीतरी वेळा ते आठवले आणि त्या त्या वेळी साचलेले मनावरील मळभ आणि कामाविषयीचे संभ्रम त्याच ओळींनी दूरही झाले !

गोष्ट अगदी साधी होती. खरे तर समस्या अशी काही नव्हतीच. विद्यार्थी परिषदेचे पूर्णवेळ काम करण्यासाठी माझी एम.एस्सी.ची परीक्षा संपताच मी गोव्यात दाखल झालो. काही महिन्यांतच तेथील स्थायी कार्यकर्त्यांनी निधी उभारून दादा वैद्य रोडवर परिषदेसाठी एक नवे कार्यालय विकत घेतले. एका मोठ्या अपार्टमेंट मधील या फ्लॅटमध्ये पाण्याची समस्या होती. काही कारणांनी नगरपालिकेच्या पाईपलाईनचे पाणी आमच्या या फ्लॅटमधील कोणत्याच नळांना येत नव्हते आणि त्यासाठी नगरपालिकेत वारंवार जाऊन अर्ज, विनंत्या करण्याचे काम मलाच करावे लागत होते. एकतर पणजीत राहणारा आणि भरपूर वेळ उपलब्ध असणारा असा कोणीही व्यावसायिक, स्थायी कार्यकर्ता गोव्याच्या तेव्हाच्या टीममध्ये नव्हता आणि त्या तुलनेत माझ्याकडे वेळचवेळ होता. शिवाय नगरपालिकेचे कार्यालय आमच्या या नव्या जागेपासून अगदी जवळच होते. पण तरीही 'आपण पूर्णवेळ कार्यकर्ते आहोत, त्यामुळे अशी व्यवस्थात्मक कामे आपली नाहीत' असा एक बालसुलभ अहंकार माझ्या मनात निर्माण झाला होता. आज हसू येते; पण वयाच्या चोविशीत असे बरेच गंड मनात असायचे...मी उद्विग्न होऊन तेव्हा आमचे प्रांतप्रमुख असलेले डॉ. अशोकराव मोडक यांना एक पत्र लिहिले आणि माझी 'व्यथा' थेट त्यांच्यापुढे मांडली ! मला वाटले, सर माझ्या या 'व्यथे'ची दखल घेऊन स्थानिक कार्यकर्त्यांना कामाला लावतील आणि मला सांत्वनाचे चार शब्दही लिहितील. पण झाले उलटेच! 'कोणतेही काम तुच्छ न समजता केले

पाहिजे. ते अंततः संघटनेच्या ध्येयाकडेच आपल्याला घेऊन जाते' अशा आशयाचा तो श्लोक, ते निरूपण म्हणजे अशा तक्रारी पुन्हा न करण्याची मला दिलेली सौम्यशी तंबीच होती !

सरांचे मला आलेले हे बहुधा पहिलेच पत्र ! पुढे पूर्णवेळ कार्यकर्ता म्हणून दोन-अडीच वर्षे आणि त्या नंतरही थोडा काळ काही तात्कालिक निमित्ताने सरांशी होणारा पत्रव्यवहार कायम राहिला. अभ्यास, लेखन, प्रवास, बैठका या सर्व व्यापांतून वेळ काढून सर आवर्जून प्रत्येक पत्राला सविस्तर उत्तर द्यायचे. त्यांना पत्र पाठवणारा केवळ मीच एकटा नव्हतो. आपल्या मासिक खर्चाचे अव्यय पत्रक आणि सोबत महिनाभरात आपण काय काम केले, काय अडचणी जाणवल्या याविषयी विस्तृत पत्र प्रत्येक पूर्णवेळ कार्यकर्त्याने प्रांतप्रमुख या नात्याने, अशा कार्यकर्त्यांचे पालक असणाऱ्या मोडक सरांना पाठवले पाहिजे हा एक अलिखित दंडकही होता. पण सरांना पाठवल्या गेलेल्या प्रत्येक पत्राचे काळजीपूर्वक वाचन करूनच ते प्रत्येकाला उत्तर देत असत. ही उत्तरे वरवरची नसत. त्यात त्या कार्यकर्त्याला त्याच्या आणि संघटनेच्या विकासासाठी आवश्यक असणारे नेमके मार्गदर्शन असायचे.

१९७५ ते १९९५ हा खऱ्या अर्थाने विद्यार्थी परिषदेच्या स्थित्यंतराचा काळ होता. यशवंतराव केळकरांच्या कुशल संघटनशास्त्राच्या आधारे जी सशक्त पायभरणी झाली होती त्यावर विविध आयामांची, संघर्षशील चळवळीची आणि पर्यायाने नेतृत्व निर्माणाची सुडौल रचना उभी राहिली ती याच काळात. स्वर्गीय बाळासाहेब आपटे, अशोकराव मोडक आणि अनिरुद्ध देशपांडे यांच्यासारखे धुरीण हे या काळातील बिनीचे शिलेदार ! डॉ. विश्वासराव पाटील आणि डॉ. सर्जेराव ठोंबरे यांसारख्या प्राध्यापकांनी नंतरच्या दशकात हीच परंपरा पुढे चालवली.

पंडित दीनदयाळ उपाध्याय यांनी मांडलेले 'एकात्म मानव दर्शन' हा आज केवळ अभ्यासाचा, भाषणाचा विषय राहिलेला नसून, केंद्र आणि अनेक राज्यसरकारांतर्फे राबविल्या जाणाऱ्या कितीतरी कल्याणकारी योजनांचा पायाभूत विचार बनला आहे. अशोकराव हे या विचारांचे साक्षेपी अभ्यासक. त्यांनी या विषयी लिहिलेली पुस्तके त्यांच्या व्यासंगाची साक्ष तर देतातच, पण हा वरवर कठीण वाटणारा विषय आणि विचार उलगडवून दाखवताना ते किती सहजतेने मुद्देसूद लिखाण करतात याचाही प्रत्यय येतो.

केवळ लिखाणच मुद्देसूद नाही, तर भाषणही तसेच. भूमितीतील एखादी आकृती काढावी तसे मोजून, मापून बेतलेले आणि त्यामुळेच प्रभावी आणि परिणामकारक होणारे. 'आजच्या माझ्या मांडणीचा विषय हा आहे... त्यात मी एकूण इतके मुद्दे मांडणार आहे... पूर्वार्धात त्या सर्व मुद्द्यांची संक्षिप्त जंत्री सांगतो, नंतर उरलेल्या वेळात त्याचे थोडे सविस्तर स्पष्टीकरण देतो आणि शेवटी पुन्हा एकदा सर्वांची उजळणी करून माझे बोलणे मी संपवणार आहे...' असे म्हणत त्यांनी अभ्यासवर्गात किंवा जाहीर भाषणांमध्ये आपल्या व्याख्यानाला सुरुवात केली की, नकळत आम्ही अनेकजण आपापल्या डायऱ्या आणि पेन सरसावून बसायचो. अशा नोट्स घेणाऱ्यांच्या दृष्टीने अशोकरावांचे भाषण म्हणजे निव्वळ पर्वणीच असायची ! अगदी अलीकडेच दाजीशास्त्री पणशीकरांच्या उपस्थितीत झालेले पार्ले येथील त्यांचे भाषणही त्याला अपवाद नव्हते. मोजका अभिनिवेश, मध्येमध्ये साजेशा कोपरखळ्या आणि तुडूंब भरलेला आशय ही त्यांच्या भाषणाची वैशिष्ट्ये ! संदर्भांची भरपूर रेलचेल. किंबहुना त्याशिवाय ते बोलतच नसत. जवळ त्यांच्या स्वतःच्या टिपणांच्या फुलस्केप कागदांची चळत असायचीच. छानदार लकबीने मान हलवत ते त्यांच्या मांडणीतील महत्त्वाच्या मुद्द्यांना संदर्भांची जोड द्यायचे. 'अमुक अमुक

यांनी लिहिलेले, इतक्या साली प्रकाशित झालेले हे पुस्तक, त्यातील पृष्ठ क्रमांक हा आणि त्यातील हा उल्लेख....' असे ते जेव्हा सांगत तेंव्हा अनेकदा मी ते लिहून घेतले आहे आणि चक्क पडताळूनही पाहिलेले आहे !

धुळे येथे महाविद्यालयीन शिक्षण घेत असताना संघ, विद्यार्थी परिषदेशी असणारा त्यांचा संपर्क अधिक गतिमान झाला. त्याच दरम्यान एकदा पंडित दीनदयाळ उपाध्याय हे जनसंघाच्या कार्यक्रमासाठी धुळे येथे येणार असल्याची बातमी त्यांना समजली आणि आपल्या महाविद्यालयात त्यांचे व्याख्यान ठेवण्याची संधी त्यांनी व्यवस्थापनाशी संघर्ष करून साधली. प्राचार्य नानासाहेब वैद्य हे वेगळ्या विचारधारेचे. त्यांनी प्रथम पंडितजींच्या व्याख्यानाला परवानगी नाकारली. होकार मिळवण्यासाठी आंदोलनाचा मार्ग अवलंबावा लागला. अखेर सातशे विद्यार्थ्यांसमोर पंडितजींचे 'भारतीय संस्कृती और समाजवाद' या विषयावर अभ्यासपूर्ण व्याख्यान झाले. ते इतके परिणामकारक आणि प्रभावी झाले की, खुद्द प्राचार्यांनीच पुढे येत या कार्यक्रमाचे आभारप्रदर्शन केले. एका अभ्यासू कार्यकर्त्याच्या सामाजिक कार्याची सुरुवातच अशी संघर्षातून झाल्याने, आपल्या हक्कांसाठी विद्यार्थ्यांना कराव्या लागणाऱ्या आंदोलनांचे मोल त्यांनी जाणले आणि वेळोवेळी सर्वांपुढे आग्रहाने मांडले देखील!

प्रत्यक्ष पंडितजींच्या व्याख्यानातून समजलेला एकात्म मानवतावाद पुढे त्यांच्या चिंतनाचा आणि लिखाणाचाही विषय झाला. त्यांच्या या विषयाच्या आकलनाच्या सखोलतेला ही पार्श्वभूमी होती.

चाळीसगाव येथे प्राध्यापक म्हणून नोकरीची सुरुवात झाली. स्व. यशवंतराव केळकर यांच्याशी परिचय झाला तो याच काळात. प्राध्यापक कार्यकर्ता कसा असावा याचे मूर्तिमंत उदाहरण म्हणजे यशवंतराव. शनिवार, रविवार या दोन दिवशी परिषदेच्या कामासाठी नियमित प्रवास सुरू होणे हे मग ओघानेच आले. नाशिक, धुळे आणि जळगाव या खानदेशातील तीनही जिल्ह्यांत अशोकरावांनी त्या चार वर्षांच्या काळात सतत प्रवास केले. आज अग्रगण्य असलेल्या एका विद्यार्थी संघटनेच्या जडणघडणीचा हा काळ ! सामाजिक कार्य आणि स्वतःचे अध्ययन यांच्यातील सुवर्णमध्य शोधत अशोकरावांसारखी काही तरुण प्राध्यापक मंडळी या काळात सक्रीय होती.

पुढे काही काळाने एका शिष्यवृत्तीच्या आधाराने सरांनी दिल्लीच्या 'स्कूल ऑफ इंटरनॅशनल स्टडीज'मधून रशियन भाषा या विषयात एम.फील. केले आणि त्यांना काही वर्षे रशियात जाण्याची संधीही मिळाली. मार्क्सवाद, रशियन क्रांती,त्याचे परिणाम हा त्यांच्या अध्ययनाचा प्रमुख विषय बनला तो याच काळात. रशियाहून परतताच काही काळातच ते मुंबईच्या राम नारायण रुइया महाविद्यालयात रुजू झाले आणि मग एका अर्थाने कायमचेच मुंबईकर झाले.

जडवाद हाच आत्मा असलेले मार्क्सवादी तत्वज्ञान आणि चैतन्यमय आत्मा असलेले भारतीय तत्त्वज्ञान यांचा तौलनिक अभ्यास ऐकवा तो सरांकडून ! हे भाग्य त्याकाळात कित्येकदा मिळाले. आंतरराष्ट्रीय घडामोडींकडे बघताना आपण आपल्या राष्ट्रवादाच्या पार्श्वभूमीवर त्याचे बलाबल तोलले पाहिजे हा त्यांचा आग्रह लक्षात यायला लागला. स्वामी विवेकानंद हाही त्यांनी जाणीवपूर्वक आपल्या अध्ययनाचा विषय म्हणून निवडला. मनुष्य, त्याचे अस्तित्व, त्याचा विकास, समाज आणि राष्ट्र या कल्पना, त्यातील माणसाचे स्थान, त्यातून निर्माण होणारे सामाजिक व राष्ट्रीय प्रगतीचे विविध मार्ग आणि अंततः त्यातील शाश्वत पर्याय या विषयीचे मार्क्स, विवेकानंद आणि दीनदयाळ यांचे विचार

हा विस्तीर्ण पट सरांनी गेली चाळीस वर्षे आपल्यापुढे मांडला.

१९१७ ते १९८७ हा साधारण ऐंशी वर्षांचा कालखंड म्हणजे मार्क्सवादाचे सत्ताकारण ते त्याचे अधःपतन हा प्रवास आहे. अशोकरावांच्या अभ्यासाचा हा अगदी खास विषय ! परिषदेच्या कितीतरी अभ्यासवर्गांमध्ये या विषयावरची त्यांची सत्रे आजही स्मरणात आहेत. महाराष्ट्रातील प्रमुख आणि अनुभवी कार्यकर्तेच अशा वर्गांना उपस्थित असत. त्यामुळे थट्टा-मस्करीला मज्जाव नसायचा. अशोकरावांच्या भाषणातील प्रमुख मुद्दे त्यांच्या अर्कचित्रासह आणि 'मोदकेश्चेव्ह' (ख्रुश्चेव्ह, गोर्बाचेव्ह या धर्तीवर) या त्यांच्या कार्यकर्त्यांत लोकप्रिय असणाऱ्या टोपणनावासह दुसऱ्या दिवशीच्या भित्तीपत्रकात लावले जायचे ! त्यांच्या भाषणाची हुबेहूब नक्कल केली जायची. प्रत्येक गोष्टीची, घटनेची प्रथम मार्क्सवादी दृष्टीने मीमांसा आणि नंतर सरांच्या दृष्टीने त्यावर टीकाही केली जायची. विशेष म्हणजे हास्याच्या या गदारोळात सर स्वतःच अग्रभागी असायचे !

गोवा येथे मी पूर्णवेळ काम करीत असताना त्यांचे गोवा विद्यापीठात एक व्याख्यान प्राध्यापकांच्या एका रिफ्रेशर कोर्समध्ये होणार होते. स्वाभिकपणेच त्यांनी मला ते आधीच कळवले व त्या ठरावीक दिवशी 'आपण विद्यापीठात भेटू, तू तेथे ये' असेही मला सांगितले. विद्यापीठीय कामानिमित्ताने होणाऱ्या प्रवासात त्या त्या ठिकाणच्या पूर्णवेळ कार्यकर्त्यांना आवर्जून वेळ काढून भेटणे हा शिरस्ता ते कसोशीने पाळत असत. त्यात उपचार नसायचा, तर एक मनःपुतता असायची. ठरल्याप्रमाणे आम्ही भेटलो. माझ्या कामाबद्दल बरीचशी माहिती त्यांच्याकडे पोहचलेली होती. मी भरपूर प्रवास करतो हे त्यांना ठावूक होते. दक्षिण गोव्यातील काही तालुक्यांमध्ये काम करतांना मात्र कमी पडतो हेही त्यांना समजले होते. काय अडचणी आहेत हे त्यांनी आपणहून विचारले आणि काही व्यवहारिक व उपयोगी अशा सूचनाही दिल्या. काय वाचतो आहे हे विस्ताराने विचारले. घरच्या गोष्टींबद्दल आपुलकीने चौकशी केली. एक पालक आणि एक पाल्य अशीच ती भेट होती.

खरे तर त्यांच्या या प्रवासाचा फायदा घेत मी एक आगाऊपणा केला होता. पणजीच्या आमच्या कार्यालयासमोरच असलेले महाराष्ट्र परिचय केंद्र आणि ग्रंथालय यांच्या संयुक्त विद्यमाने त्यांचे एक व्याख्यान मी परस्परच ठरवून टाकले होते. ते तसेही चार-पाच दिवस राहणार होते. ते गोव्यात आल्यावर पहिल्याच दिवशी आमची भेट झाली. मी त्यांना थोडे दबकतच या ठरवलेल्या भाषणाबद्दल सांगितले. मला वाटले ते खूश होतील आणि शाबासकीही देतील. पण तसे काहीच झाले नाही. त्यांनी 'त्या संस्थांनी तसे पत्र दिले आहे का?' असे विचारले. मुळात माझाच उत्साह अधिक असल्याने मीच या संस्थांना राजी केले होते. त्यामुळे त्यांनी पत्र वगैरे देण्याचा विषयच नव्हता. तसे पत्र घ्यायला हवे याचा मलाही उत्साहाच्या भरात विसर पडला. 'त्या कार्यक्रमाची तयारी काय झाली आहे?' असे त्यांनी विचारातच मी पुन्हा नकारात्मक मान हलवली. सरांचा होकार आल्यावर आम्ही हा कार्यक्रम जाहीर करू असे त्या संस्थांनी मला आधीच सांगितले होते. एकूण प्रकार सरांच्या लक्षात आला. 'त्यांनी हा कार्यक्रम होणार नाही व असे ऐनवेळेस ठरलेले व्याख्यान मी देणार नाही' असे मला स्पष्टपणे सांगितले. सहाजिकच माझा चेहरा पडला. थोडावेळ असाच गेला. बहुधा सरांनी तो मुद्दामच जाऊ दिला आणि मग ते शांतपणे आणि नेहमीच्या सहजतेने पुन्हा बोलू लागले. 'जयंत, परिषद-संघ या कामासाठी आपण एका पायावर कोठेही जायला तयार असतो. तेथे उपचारांची गरज नसते, कारण त्यात आपलेपणा असतो. पण काही ठिकाणी ही औपचारिकता पाळणे गरजेचे असते. केवळ तुझा

उत्साह पाहून त्या संस्था तयार झाल्या असाव्यात असे मला वाटते. संस्थात्मक कार्यक्रम मुळात असे ऐनवेळेस ठरत नसतात. त्यामुळे 'तू माझ्याकडून होकार आण; मग आम्ही कार्यक्रम जाहीर करतो' अशी सावध भूमिका त्यांनी घेतली. त्यांचे काहीच चूक नाही. मी नकार देतोय त्यात माझीही काही चूक नाही. मधल्यामध्ये तू पकडला गेलास. याचे कारण उत्साहाच्या भरात तू हे सर्व ठरवलेस. आपल्या वक्त्यांना आपणच under estimate करण्याचा धोका यात असतो, म्हणून मी येत नाहीये...' मला त्यांनी नेमकेपणाने सांगितले. मला चूक समजली. चेहरा पूर्ववत झाला. 'खरे तर तुला फक्त चहासाठी येथे बोलावले होते, पण तुझ्या या चुकीची शिक्षा म्हणून तू आता जेवायलाही इथेच थांब. आपण आणखी थोड्या गप्पा मारू..' असे म्हणत त्यांनी माझ्या मनावरचा उरलासुरला ताणही दूर केला.

१९८५ हे आंतरराष्ट्रीय युवा वर्ष. त्या काळात सर अभाविपचे राष्ट्रीय अध्यक्षही होते. दिल्ली येथील राष्ट्रीय अधिवेशनात झालेली 'जागतिक विद्यार्थी व युवा संघटने'ची स्थापना, त्याला अटलजींची उपस्थिती आणि जागतिक विचारधारांच्या संघर्षांत 'वसुधैव कुटुंबकम' हे भारतीय तत्त्वज्ञान जागतिक पातळीवर नेण्यास सिद्ध असणारी विद्यार्थी व युवकांची ही नवी संघटना या मुद्याभोवती झालेले सरांचे भाषण या सर्व गोष्टी म्हणजे परिषदेच्या आजवरच्या वाटचालीतील एक लक्षणीय टप्पा ठरल्या आहेत !

विद्वत्ता आणि राजकीय व सामाजिक घटनांचे विश्लेषण करण्याची प्रभावी हातोटी याचा परिणाम म्हणून विधानपरिषदेत कोकण पदवीधर मतदार संघाचे प्रतिनिधित्व करण्याची जबाबदारी त्यांच्याकडे आली. सलग दोन वेळेस ते आमदार म्हणून निवडून आले. ना.स.फरांदे, सूर्यभानजी वहाडणे पाटील यांसारख्या तत्कालीन दिग्गज आणि अभ्यासू लोकप्रतिनिधींच्या सहकार्याने त्यांनी या कालखंडात विविध समस्यांवर उठवलेला आवाज, विचारलेले प्रश्न, तयार केलेले अहवाल आणि सुचवलेले पर्याय हा एक स्वतंत्र लेखाचा विषय आहे ! विधान परिषदेतील आमदारकीची दुसऱ्या वेळेची जबाबदारी संपली आणि हळूहळू सरांनीही राजकारणातून निवृत्ती घेतली.

रशिया, हॉलंड, अमेरिका यांसारख्या देशांमध्ये पाठ्यवृत्तीच्या निमित्ताने झालेला दीर्घकाळाचा अध्ययन प्रवास, अनेक देशांना व्याख्यान आणि परिषदांच्या निमित्ताने दिलेल्या भेटी यातून 'आंतरराष्ट्रीय घटनांचे भाष्यकार' हा त्यांच्या व्यक्तित्वातील पैलू आपोआपच साकारत गेला. अभ्यास आणि अनुभव या आधारे हिंदुत्व चळवळीला त्यांनी नव्वदीच्या दशकात, या विचारधारेच्या ऐन कसोटीच्या काळात एक मोठाच वैचारिक आधार दिला. स्वामी विवेकानंद, स्वा.सावरकर आणि लोकमान्य टिळक यांच्या विचारांतील आणि कृतीतील समानता शोधून त्यावर भाष्य करणारे त्यांचे पुस्तक, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मौलिक योगदानाविषयी त्यांनी दिलेली व्याख्याने ह्या आम्हा कितीतरी कार्यकर्त्यांच्या वैचारिक प्रगतीला हातभार लावणाऱ्या गोष्टी आहेत.

अगदी अलीकडे जवळपास तीन वर्षे मी 'म्हाळगी प्रबोधिनीत' कार्यकारी संचालक म्हणून काम पाहत होतो. प्रत्येक महिन्यांत एक-दोनदा तरी त्यांचा फोन येणारच. त्यांनी वाचलेले आणि काही वेगळे मुद्दे समोर आणणारे लेख ते आवर्जून मला वाचायला सांगत असत. विजय गोखले यांनी बरीच वर्षे चीनमध्ये भारताचे राजदूत म्हणून काम केले. त्या अनुभवांवर आणि त्यांच्या अभ्यासावर आधारित 'तियानानमेन : द मेकिंग ऑफ अ प्रोटेस्ट' हे पुस्तक अलीकडेच प्रकाशित झाले. त्यातील काही महत्त्वाचा अंश सरांच्या वाचनात आला. त्यांनी फोन करून प्रबोधिनीच्या ग्रंथालयात हे पुस्तक

आपण मागवले पाहिजे हे सांगितले. योगायोगाने माझ्या व्यक्तिगत संग्रहात हे पुस्तक असल्याने मी ते वाचले होते. कितीतरी मुद्यांवर मग आम्ही चर्चा केली. 'तियानानमेन चौकात प्रत्यक्ष मोठे हत्याकांड घडलेच नाही' हे गोखलेंच्या पुस्तकातील विधान त्यांना अचंबित करणारे होते. मीही त्या विधानाला दुजोरा दिला आणि 'चौकात विद्यार्थ्यांना नव्हे, तर बीजिंगमधील रस्त्यांवर रणगाड्यांना विरोध करणाऱ्या अनेक निरपराध नागरिकांना सैनिकांनी बेछूट गोळीबार करून मारले' हे सांगितले. मी चीनमधील लोकशाही आंदोलनावर आणि त्यासाठी लढणाऱ्या काही कार्यकर्त्यांवर अभ्यास करतो आहे हे त्यांना सांगताच त्यांना स्वाभाविकच आनंद झाला. या आमच्या संभाषणाच्यावेळी ते खरेतर दुर्धर आजारावर उपचार घेत होते. त्यांना कमालीचा अशक्तपणा जाणवत होता. मी बोलणे आवरते घेत होतो आणि ते एकेक मुद्दे मांडत होते. त्यांच्या शोधकतेचा आणि इच्छाशक्तीचा असा दुहेरी प्रत्यय होता तो !

पवईतील त्यांच्या फ्लॅटचे काही प्रमाणात नूतनीकरण करायचे होते. सर्व घर व्यापून राहिलेला त्यांचा ग्रंथसंग्रह मी काही काळ प्रबोधिनीत घेऊन जावा असे त्यांनी सुचवले आणि मी माझ्या दोन सहकाऱ्यांसह त्यांच्या घरी हजर झालो. वर्गवारी करून ठेवलेली हजारपेक्षा अधिक पुस्तके आणि बऱ्याच फाईल्स आम्ही घेऊन आलो. खरी गंमत इथून पुढे सुरू झाली. ग्रंथ संग्रह आमच्या हवाली केला; पण त्यांचा अभ्यास आणि लिखाण सुरूच होते. अचानक एखादा संदर्भ त्यांना हवा असायचा. मग ते फोन करीत. 'अमुक एका पुस्तकात अमुक एक तपशिलाचा कागद घालून ठेवला आहे, तो कागद किंवा त्याची फोटोकॉपी पाठव' असे ते सांगत. मी ती सूचना पुढे पाठवायचो आणि आमचे ग्रंथालय सहाय्यक पाचव्या मिनिटाला ते टिपण घेऊन हजर व्हायचे. पुस्तकाचे नांव, वर्गवारी, टिपणाचा विषय आणि कागदांची साधारण संख्या यात कुठेही गोंधळ नसायचा. मला तत्क्षणी तीसेक वर्षांपूर्वी व्याख्यान देणारे सर आठवायचे. 'मुद्दा क्रमांक अमुक, संदर्भ पुस्तकाचे नांव हे, त्यातील पृष्ठक्रमांक हा....' तोच नेटकेपणा आणि तीच स्पष्टता !

केंद्र सरकारतर्फे सन्मानपूर्वक दिले जाणारे 'राष्ट्रीय संशोधक-प्राध्यापक' हे पद स्वीकारून त्यांनी त्यांच्या संशोधन क्षेत्रातील कामाला गेल्या काही वर्षांत अधिक वेळ दिला आणि दीनदयाळ उपाध्याय यांच्या कल्पनेतील सर्वांगीण विकासाचे पैलू उलगडवून दाखवणारा मौलिक ग्रंथ प्रकाशित केला. 'छत्तीसगड केंद्रीय विद्यापीठाचे कुलपती' म्हणूनही त्यांच्याकडे जबाबदारी होती.

सरांना अगदी अलीकडेच चतुरंग संस्थेचा जीवन-गौरव पुरस्कार जाहीर झाला तेंव्हा सहजच त्यांना फोन केला. 'मी तुमच्या व्यक्तित्वावर लिहिणार आहे..' हेही सांगितले. गोव्यात त्यांच्या भाषणाच्या बाबतीत केलेला आगाऊपणा मला पुन्हा करायचा नव्हता. त्यांनीही हसून परवानगी दिली. आठवडाभर मी मनात जुळणी करीत होतो. परिषदेतील दिवस आठवीत होतो. त्या काळात पुन्हा जगत होतो आणि मग अशी सर्व सिद्धता करून लेख लिहायला सुरुवात केली. अनाहूतपणे पहिलेच वाक्य लिहिले.......

'माझ्या या लेखातील मुद्दा क्रमांक एक....' !

अशोकरावांच्या स्मृतीला मनःपूर्वक वंदन !!

**- जयंत कुलकर्णी**
रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी
उत्तन, भाईंदर

●●●

# उंटांची अद्‌भूत रम्य दुनिया
# २०२४ हे आंतरराष्ट्रीय कॅमेलीड्सचे वर्ष

*प्रस्तुत लेखाच्या शीर्षकावरून 'उंट' या प्रजातीची माहिती वाचण्याची उत्सुकता प्रत्येकाच्या मनात निर्माण नक्कीच झाली असेल! वाचा तर... - संपादक*

**अवतार**

अनेक वर्षांपूर्वी त्या थंडीच्या सकाळ नंतर तिने मनमोहक व आकर्षक ग्रामीण राजस्थानात, रायका आणि त्यांच्या उंटांच्या जगात प्रथम पाऊल ठेवले. त्यावेळेस एकमेव हॉटेल ढोला-मारू टुरिस्ट बंगल्यात तिला नेण्यासाठी फक्त घोड्याचा टांगा हे वाहन होते. प्रवासाची स्वतःची गती असते त्याप्रमाणे, वेळ जवळजवळ नकळत निघून गेला. त्या मधल्या काळात जग बदलले आहे.

त्यावेळेस, टेलिफोन ऑफिसमध्ये ट्रंक कॉल्स काही दिवस आधीच बुक करावे लागत असे आणि तातडीच्या संपर्कासाठी टेलिग्राम हे एकमेव साधन होते. आता जवळजवळ प्रत्येकाकडे मोबाईल आहे - भटक्या जमाती व्यतिरिक्त, कारण ते रिचार्ज करण्यासाठी त्यांच्याकडे जागा नसल्यामुळे नाहीत. थोड्याच काळापूर्वी भारतात टेलिग्राम अधिकृतपणे बंद केले गेले.

ॲम्बॅसिडरकार जी इल्सच्या सुरुवातीच्या प्रत्यक्ष जागेवरील कामाशी निगडित होती ती जवळजवळ नामशेष झाली आणि त्याची जागा आकर्षक विदेशी मॉडेल्सने घेतली आहे. अगदी ग्रामीण भागातही पारंपरिक स्थानिक सामाजिक संस्थांचा पगडा कमी होत आहे व त्यांची जागा सोशल मीडियाने घेतली आहे. आपणही बदललो आहोत. एका विनम्र टॅक्सी ड्रायव्हर उंटांचा व उंटपाळांचा उत्तम समर्थक झाला आहे. आणि पशुपालकासाठी दलीबाई एका वर्ज्य आणि शांत ग्रामीण स्त्रीपासून एक धाडसी, आकर्षक आणि जागतिक स्तरावर मान्यताप्राप्त पशुपालक नेता बनली आहे. इल्स यापुढे एक दिशाहीन अभ्यासू न राहता, एका भूतदयाशील व आणि जबाबदार पशुधन पाळण्याच्या कामगिरीवर आहे. संस्थात्मक विकासाच्या राष्ट्रीय आणि जागतिक स्तरावरही पशुपालक अधिक महत्त्वाचे झाले आहेत. कारण एलपीपी आणि एलपीएस व्यतिरिक्त अनेक संस्था विकसित झाल्या आहेत. सर्वव्यापी तांत्रिक प्रगतीचा विचार करता उंट रायका व इतर भटक्या जमाती त्यांच्या नैसर्गिक शेवटला आल्या आहेत की, या जगात त्यांना या जगात स्थान आहे? की टप्प्याटप्प्याने तार, (टेलीग्राम) व अंबॅसिडर सारख्या त्या नाहीशा होणार ?

तिला नेहमी आश्चर्य वाटते व ती विचार करते की, आपली शहरे लोकवस्तीने कशी फुगलेली आहेत व शेतजमीन व कुरणे गिळंकृत करत आहेत. एकेकाळी साद्री ते बुटीबागेच्या रस्त्याच्या बाजूने मोकळी शेते व कुरणे असत. आता तेथे सर्व बाजूंनी भिंती उभ्या राहिल्या आहेत. कितीतरीवेळा गरज नसताना डांबरी रस्ते खूप आतील दूरच्या भागातही झाले आहेत. मूल्ये कशी बदलली आहेत. तरुण शिकलेले रायका शहरांकडे वाहवत जाता आहेत व एकाच पिढीमध्ये लोक त्यांच्या परंपरा व वारसा विसरले आहेत.

त्यांनी प्रयत्न करूनही भारतात उंटाना चांगले दिवस आले नाहीत. उंटांची संख्या कमी होत राहिली, कारण कामाला लागणाऱ्या उंटांची गरज जवळ जवळ नाहीशी झाली. २०१३च्या पुष्कर मेळाव्यांत ५००० पेक्षा कमी उंट आले. आणखी वाईट गोष्ट म्हणजे त्यांतील बहुतेकांना

चांगले खरेदीदार मिळाले नाहीत. ते मांसासाठी विकले गेले किंवा त्यांच्या मालकांना त्यांना घरी परत न्यावे लागले. हे मेलेल्या घोड्याला मारण्यासारखे किंवा मेलेल्या उंटाला मारण्यासारखे वाटते. पण हे नेहमीसारखेच आहे, समजण्यास कठीण.

जरी विकास वेगवान असला तरी तिला उंटासाठी व रायकांसाठी व इतर भटक्या जमातींसाठी भविष्य व तातडीची गरज दिसते.

ती अनेक कारणांमुळे आशावादी आहे. आपण हे विसरू शकत नाही की, उंट हा अष्टपैलू व बहुउद्देशीय प्राणी आहे जो माणसाच्या अनेक मूलभूत गरजा भागवू शकतो. जोपर्यंत तेल मिळत आहे व किफायतशीर आहे, तोपर्यंत त्याचे वाहतुकीसाठी व शेतातील काम तात्पुरते तरी कमी झाले आहे. पण त्यांची दुग्धजन्य जनावर म्हणून क्षमता प्रचंड आहे. पण त्यासाठी मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक, व जबाबदारी खाजगी व सरकारी (सार्वजनिक) पातळीवर आवश्यक आहे.

या खेरीज इतर अनेक पर्यावरणास अनुकूल उत्पादने आहेत, जी आनंदी उंटांपासून बनवता येतात आणि ते फक्त भारतातील आणि परदेशांतील - शहरी लोकांची नवोदित इच्छा पूर्ण करण्यासाठी व परत निसर्गाशी जोडण्यासाठी. आता ते नवीन प्रवासाला निघाले होते. उंटाना या नवीन ग्राहकांशी जोडायला.

काहीं वर्षापूर्वी एका मित्राने तिला एक नवीन वस्तू, हत्तीच्या शेणाचा कागद, हो, हत्तीच्या शेणापासून तयार झालेला कागद, - जो एका हातीछाप नावाच्या फर्मकडून जयपूरमध्ये तयार केला जात असे व अनेक प्रकारच्या स्टेशनरीमध्ये तयार होत असे, - हणमंत आणि तिने थायलंडमध्ये तयार झालेला हत्तीच्या शेणाचा पेपर पाहिला होता. त्यामुळे तीच पद्धत उंटांच्या शेणापासून पेपर तयार करण्याची नैसर्गिक पद्धत होती.

या प्रकल्पाशी संबंधित लोकांशी संपर्क साधला असता, महिमा मेहरा व विजेन्द्र शेखावत यांनी लगेचच हा प्रयोग करायला संमत्ती दर्शविली. त्यांनी एका गोणीमध्ये उंटाचे वाळलेले शेण भरले व ते जयपूरच्या कारखान्यांत पाठवले व लौकरच त्यांच्या हातात उंटाच्या शेणाचा पेपर होता. बाभळीच्या बिया व इतर झाडांचा पालापाचोळा उंट खात असत त्यामुळे तो थोडासा दाणेदार व खरखरीत होता.

पण त्याला वेगळे व अद्वितीय रूप होते. तो तपकिरी व नैसर्गिक होता व त्याचा स्पर्श भरीव व लक्षणीय होता. त्यानंतर हातीछाप अतिशय उत्साहाने व उदारपणे त्यांना थोड्या वस्तूंचे उत्पादन, नोटबुक, नोटपॅड, ग्रिटींग कार्ड्स करण्यासाठी मदत करण्यास तयार होते. विरेन्द्रनी त्यांना हाताने बनवलेल्या पेपरचे युनिट बुटीबागच्या आवारांत साद्री येथे चालू करायला मदत केली. आता ते हा वाळवंटातील स्थानिक पेपर बनवत आहेत.

काही अविस्मरणीय योगायोगाने हिमालयातील कुल्लू मधील कमलकिशोर त्यांच्या आयुष्यात आला. कमल शास्त्रज्ञ असून, त्याला लोकरीवर प्रक्रिया करण्याचा भरपूर अनुभव आहे. 'अंगोरा रॅबिट', शेता खेरीज त्याचा स्वतःचा पर्यावरणाला अनुकूल वस्त्रेद्योग आहे. तेथे हाताने कातलेले, विणलेले, भाज्यांच्या रंगाने रंगवलेले कपडे तयार होतात. तो कुलू शाली विणकरांच्या बोर्डवर होता. त्याने त्यांचे संभाव्य उंटाच्या लोकरी संबंधी डोळे उघडले. त्यांना नेहमी वाटत आले की, त्यांच्या ड्रोमेंडरी (एक कुबडाचे उंट) उंटांची खरखरीत व तोकडी लोकर काहीतरी चांगले तयार करण्यासाठी फारशी उपयोगी नाही. खूप दाट व सतेज केसांच्या बॅक्टेरिअन उंटांबरोबर ते स्पर्धा करू शकले नसते किंवा त्यांच्या समान पातळींवर नव्हते, जे त्यांनी मंगोलीयांत पाहिले होते. पण कमलने त्यांना वेगळ्या पद्धतीने शिकवले. कमलने जयसलमेर व साद्री या दोन्ही भागांतील उंटांच्या लोकरीच्या धाग्याच्या

लांबीवर व धाग्याच्या व्यासावर काही वेगळ्या चाचण्या केल्या व त्याने शोधून काढले की, त्यांच्या लोकरीत मोठ्या प्रमाणांत बारीक व लांब लोकर आहे जी 'कश्मिरा' लोकरीच्या बरोबरीची आहे. कमलने सुचविले की, ही फक्त लोकर तिचा रंग व सूक्ष्मता यावरून वेगळी करण्याची गरज आहे. बारीक लोकर शाल व स्टोल करायला वापरता येईल, तर राठ लोकर घोंगड्या व धुरी (रफ कार्पेट) करायला वापरता येइल. धाग्याच्या वेगळ्या रंगामुळे त्यांना वेगळी डिझाइन्स करता येतील व नैसर्गिक रंगामुळे कृत्रिमरीतीने रंगवायची गरज पडणार नाही. त्याने असंही नमूद केलं की, जयसलमेरच्या लोकरीची गुणवत्ता साद्रीच्या लोकरीपेक्षा चांगली आहे, कारण हिवाळ्यात तेथे तपमान आणखी खाली जाते.

नंतर त्यांनी सर्व जयसलमेर उंट प्रजनन करणाऱ्यां-मध्ये बातमी पसरवली की, त्यांना उंटांची लोकर खरेदी करायची आहे. त्यापैकी अनेकांनी मॅनगे माईट (बारीक किडे) नियंत्रित ठेवण्यासाठी लोकर कातरली होती,पण तिचा त्यांना उपयोग नसल्यामुळे टाकून दिली होती. त्यांच्या कर्मचाऱ्यांनी ती गोळा केली. कमल व दिल्लीचे दोन डिझाईनर्स जयसलमेरलाआले व त्यांनी ती लोकर दोन वेगळ्या ढिगांमध्ये जमा केली. एक लांब व बारीक धागा असलेली व दुसरी राठ व खरखरीत केसांची. जैसलमेरला उष्णता ४५ degree celsius असताना खराब झालेल्या व धुळीने भरलेल्या लोकरीच्या ढिगाऱ्यांत लहान खोलीत बसून काम करणे म्हणजे अलौकिक होते. पण हे अतिशय उपयुक्त ठरले. शालिनी व अनुराग यांनी रग बनवले, तर हिमालयांतील कमलच्या कताई करणाऱ्या व विणकरांच्या चमूने अनेक प्रकारचे सुंदर व मऊ स्टोल्स बनविले. नग इतके सुंदर होते की, त्यांनी पॅरिसमधील आंतरराष्ट्रीय इको-फॅशन मेळ्यात नमुने प्रदर्शित करण्याचे उत्स्फूर्तपणे ठरवले. अनेक आंतरराष्ट्रीय डिझायनर्सनी ताबडतोब मंगोलियन बॅक्ट्रियन उंटांच्या पारंपरिक उंट लोकरी पासून वेगळे करण्यासाठी ड्रोमेडरी लोकर वापरण्याची इच्छा व्यक्त केली. नंतर त्यांनी तिला, पारंपरिक मंगोलियन उंटांच्या लोकरीपासून वेगळी दाखवण्ययासाठी, 'Desert Wool' म्हणून नाव दिले. मोकळेपणाने हिंडणाऱ्या, व आनंदी थर वाळवंटातील उंटांपासून वाळवंटातील पेपर व वाळवंटातील लोकरीला पुष्कर मेळाव्यांत व नेचर बाजारांत दिल्लीच्या वार्षिक हस्तकला विक्रीच्या वेळेस चांगला प्रतिसाद आहे.

नेचरबाजारांत हर्षिता नावाची मोहक, सुसंस्कृत स्त्री त्यांना भेटते व उंटाच्या दुधाला तिचा ऑटिस्टीक मुलगा खूप छान प्रतिसाद देतो आहे असे सांगते. दिल्लीच्या सीमेवर राहणाऱ्या एका उंट पालकाकडून ती उंटाचे दूध विकत घेत असे. पण लवकरच त्याला दुसऱ्या ठिकाणी स्थलांतरित व्हायचे असते. म्हणून ती काळजीत असते. Healing with Camel milk या फेसबुकच्या पेजवर जगातील सर्व ऑटीस्टिक मुलांच्या माता त्यांचे उंटांच्या दुधाच्या थेरपीचे अनुभव एकमेकीस सांगतात. पण याला शास्त्रीय बेस फारसा मिळत नाही. उंटांच्या दुधाचा उपचारात्मक उपयोगाविषयी अनेक दावे आहेत. याचे स्पष्टीकरण त्यांच्या दुधामध्ये असलेल्या रोगप्रतिबंधक शक्ती वाढविणाऱ्या प्रथिनांमुळे मिळू शकते.

मोकळे असणारे उंट कमीतकमी ३६ प्रकारच्या झाडाचा पाला खातात. त्यांच्यात phytochemicals असतात. (वनस्पतींमधील जैविक संयुगे) ते अनेक प्रकारचे रोग बरे करतात. उंटांच्या ताज्या दुधाला 'एनर्जी ड्रिंक' म्हणतात. ही सर्व एक वस्तुस्थिती आहे की, उंट कमीतकमी राजस्थानातले तरी, आणि अनेकप्रकारच्या वनस्पतींवर पोसले जातात. मुख्यतः वृक्ष यांच्यामध्ये फायटोकेमिकल्स असतात. त्यांना याची जाणीव जेव्हा ते उंटाच्या शेणापासून कागद बनविण्याच्या युनीटचे उद्घाटन करणार होते तेव्हा झाली.

त्यावेळी ते घोषवाक्य शोधत होतो जे पर्यावरण-सजग ग्राहकांमध्ये उंटांच्या शेणाचा पेपर लोकप्रिय करू शकेल आणि त्याला पृथ्वीवरील सर्वांत जैवविविध पेपर म्हणण्याची कल्पना त्यांना सुचली. ही केवळ जाहिरातबाजीची चाल नव्हती तर पूर्ण सत्य होते. सर्वसाधारण कागद हा मोठ्या प्रमाणावर लागवड केलेल्या एकाच जातीच्या झाडांपासून तयार होतो. अगदी हत्तीच्या शेणापासून बनलेला पेपर देखील मर्यादित प्रमाणात वनस्पतींनी बनलेला असतो, कारण बंदिस्त हत्तींचा आहार बऱ्यापैकी मर्यादित असतो. परंतु मोकळेपणाने वावरणारे उंट हे छत्तीस वेगवेगळ्या प्रकारच्या वनस्पती खातात. वास्तविक, ते त्याहून जास्त प्रकारच्या वनस्पती खात असावेत आणि साद्रीच्या आसपास, जैसलमेर आणि गुजरातमधील कच्छमध्येही उंट पाळणाऱ्यांनी त्याचा उल्लेख केला आहे.

उंट - शेण, माती, वाळवंटातील कागदामध्ये असलेली जैवविविधता स्पष्ट करण्यासाठी, LPPS मध्ये प्रशिक्षणार्थी म्हणून काम करणाऱ्या आयशाने, उंटांचा चारा असलेल्या छत्तीस प्रकारच्या रोपांची ओळख, छायाचित्रे आणि संशोधन केले. हे त्वरीत स्पष्ट झाले की, व्यावहारिकदृष्ट्या सर्व छत्तीस वनस्पती पारंपरिक औषधांमध्ये देखील वापरल्या जातात आणि विविध प्रकारच्या रोगांवर उपचार म्हणून प्राचीन आयुर्वेदिक ग्रंथांमध्ये त्यांचे वर्णन केले आहे.

उदाहरणार्थ, देशी बाभुळ ज्याला वैज्ञानिकदृष्ट्या 'बाभूळ निलोटिका' म्हणून ओळखले जाते, ते उंटांना सर्वांत जास्त आवडत्या झाडांपैकी एक आहे. आयशाने खालील माहिती संकलित केली.-

**औषधी उपयोग:** बाभूळ निलोटिका ही अनेक देशांमध्ये लोकप्रिय औषधी वनस्पती आहे. याची साल खोकल्यावर उपचार करते आणि तुरट म्हणूनही काम करते. याशिवाय, झाडाची साल अतिसार, आमांश आणि कुष्ठरोगावर उपचार करण्यासाठी देखील वापरली जाऊ शकते.

केनियीतील मसाई, पश्चिम आफ्रिका, लेबेनॉन, ईजिप्शियन न्युबियन अनेक देशांतील पारंपरिक औषधांमध्ये याचा अनेक रोगांसाठी उपयोग केला जातो.

जर उंट औषधाच्या या सर्व जंगली वनस्पती खात असेल तर त्याचे दूध शक्तिशाली आहे यात आश्चर्य नाही. त्याची तुलना म्हशीच्या दुधाशी केली जाते. जिला मुख्यतः अनुवांशिकदृष्ट्या सुधारित कापूस बियाणे (सरकी) दिले जाते (पेंड) व ठरावीक प्रकारच्या आहाराने भरलेल्या गायीच्या दुधाशी! उंटाचे दूध खूप आरोग्यदायी असेल आणि त्यात आणखी अनेक महत्त्वाचे सूक्ष्म पोषक घटक असतील. हणमंत नेहमीच म्हणाला आहे की, 'एक ग्लास उंटाचे दूध प्यायल्यावर त्याला नेहमीच ताजे टवटवीत वाटते. जणू त्याने अफू सेवन केली आहे.' म्हशीच्या व गाईच्या दुधापेक्षा उंटाचे दूध सकस व सूक्ष्म पोषक द्रव्यानी युक्त आहे. याचा अर्थ, उंटांच्या दुधाचे मूल्य उंट काय खातो यावर अवलंबून असते. गवत आणि अल्फल्फा यांचा पाश्चात्त्य आहार असणाऱ्या उंटांचे दूध आपल्या मुक्त-वावर असलेल्या उंटांपेक्षा कमी आरोग्यदायी असू शकते. केवळ फार्मास्युटिकल संशोधन हे कशाचे श्रेय आहे हे सांगू शकत असले तरी, इल्सला असे वाटते की, उंटांचे खाद्य असलेल्या झाडांमधील काही फायटोकेमिकल्समुळे हा परिणाम होत असणार. ते अनेक प्रकारचे रोग बरे करतात. उंटाच्या ताज्या दुधाला energy drink म्हणतात. दिवसभर उंटांच्या कळपामागे धावणाऱ्या रायकांना ते ताजेतवाने ठेवते.

उंटांच्या चाऱ्यामुळे हा परिणाम होऊ शकतो. आणि यामुळे ऑटिस्टिक मुले सकारात्मक प्रतिसाद देत असणार. आधुनिक शहरी आहारांमध्ये खतांचा

वापर केलेल्या पिकांवर (गहू, तांदूळ, मका) भर देण्यात आला आहे, ज्या मध्ये काही महत्त्वाच्या घटकांची कमतरता असू शकते. त्यामुळे संपूर्ण पोषक द्रव्ये असलेला आहार त्यांना मोकळ्या उंटांच्या दुधातून मिळू शकतो.

त्यांच्याजवळ उंटांच्या ताज्या दुधाची मूल्य श्रृंखला तयार करण्यासाठी संसाधने (आवश्यक गोष्टी) नसल्यामुळे ते त्यावर प्रक्रिया करत आहेत. अत्यंत लोकप्रिय उंट-दुधाचे आइसक्रीम ते खास प्रसंगांच्यावेळी तयार करतात. दुसरे उत्पादन - उंटांच्या दुधापासून बनवलेला साबण हा भारतात आणि परदेशात अत्यंत लोकप्रिय ठरला आहे.

लोकांच्या फक्त पौष्टिक आहार, लिहिण्यासाठी कागद, पेहरावासाठी व घर सजविण्यासाठी कापड, अशा भौतिक गरजा नसतात. सध्याच्या काळात लोकांच्या भावनिक गरजाही असतात. आणि उंट अशा गरजा भागवू शकतील. 'चुंबन देणारे उंट', साद्रीच्या आसपासचे रायकांनी पाळलेले कळप पाहुणे व पर्यटकांसाठी न विसरता येणारा अनुभव असेल, जो जगात इतर कुठेही मिळू शकणार नाही.

ज्यांच्यावर अवलंबून राहू शकतील असी मजबूत उंटांची सोबत त्यांना यात्रेच्या वेळी मिळाली, त्याची किंमतीच करता येत नाही. काही महिन्यांपूर्वी भोमसिंगने त्यांना दोन बछडे दिले, ज्यांची आई मरण पावली होती, जेणेकरून ते बुटीबागमध्ये त्यांची काळजी घेऊ शकतील. त्यांनी त्यांचे नामकरण केले. मुमल व महेन्द्र. या अनाथांनी त्यांचा परिसर उजळवून टाकला. मुमल ही मुलगी आलिंगन व चुंबन देणारी, तर महेन्द्र काहीसा भिडस्थ व संकोची. पुष्करच्या मेळ्यानंतर आणखी तीन उंट त्यांना येऊन मिळाले. मीराचे नातू व पणतू. मीरा जिला ९१ साली तिने विकत घेतले होते. पण त्यांना पुष्करच्या मेळ्यांत खरेदीदार मिळाले नाहीत. ते वातावरणात रुळू लागले होते, पण त्यांच्यासाठी काम शोधायचा उंटाच्या गाडीसाठी किंवा सवारीसाठी ते प्रयत्न करणार असतात.

कदाचित रणकपूर, जिथे दलीबाईने उंट उत्पादनांची विक्री करणारे एक छोटेसे दुकान उघडले आहे आणि बुटीबाग दरम्यान पर्यटकांना नेण्यासाठी उपयोग होऊ शकतो.

हे सर्व उपक्रम फक्त शहरी, देशी व परदेशी पर्यटकांवर लक्ष केन्द्रित करून केलेले नाहीत; परंतु त्याहूनही महत्त्वाचे म्हणजे ग्रामीण भागातील लोकांसाठी, ज्यापैकी अनेकांना त्यांच्या गावामध्ये उत्पन्नाची संधी नसल्यामुळे शहरांमध्ये जाण्यास भाग पाडले जाते त्यांच्यासाठी आहेत. रायका तरुणांपैकी बरेच जण शहराकडे वळले असले तरी, त्यांच्यापैकी काही जण स्थानिक पातळीवर नोकऱ्या शोधण्यास प्राधान्य देतात. आयशा, खेडूत कुटुंबातील तरुणांच्या परिस्थितीवर भूगोल पदवीसाठी संशोधन करत असताना, शहरात काम करणाऱ्या तरुणांच्या तिने मुलाखती घेतल्या. शहरांतील त्यांच्या कामाच्या परिस्थितीबद्दल भयानक कथा ऐकल्या: अठरा तास कामाचे दिवस, झोपेसाठी जागा नाही आणि अस्वच्छ पाण्यामुळे अनेकदा कमजोर करणारे रोग होतात.

उंटाची उत्पादने विकसित करून, शहरी अस्तित्वाला दुसरा पर्याय उपलब्ध करून देण्यासाठी ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात नोकऱ्या निर्माण केल्या जाऊ शकतात. जैसलमेरमधील विधवा आधीच उंटांची लोकर पारंपरिक चाकाने सूत बनवतात, जालोरमधील एक विणकर दांपत्य रग बनवत आहे, साद्रीच्या आसपास काही स्त्रिया उंटांच्या लोकरीपासून खेळणी आणि टोप्या विणतात, तर काही उंटांच्या शेणावर प्रक्रिया करून पृथ्वीवरील सर्वांत जैव-विविध कागद बनवतात. हा नोंदित उपक्रम वाढण्यास वेळ लागेल, परंतु तो वाढेल आणि अखेरीस उंट

(पृष्ठ क्र. २० वर)

# सिनेमा, सेन्सॉर बोर्ड आणि न्यायालये

*प्रस्तुत विषय हा जनसामान्यांना माहीत नसतो. परंतु 'सिनेमा' या विषयाबाबत, त्यातील अंतर्गत काही मुद्यांबाबत जर कुतूहलात्मक दृष्टीतून काही माहिति जाणून घेतली तर ती उत्सुकता ज्ञानात्मक ठरते. - संपादक*

सिनेमासारख्या कलाकृतीच्या माध्यमातून दर्शविलेल्या अभिव्यक्तीच्या स्वात्रंत्र्यावरील कायदेशीर निर्बंध लावण्याचे काम सेन्सॉर बोर्ड करत असते. दिग्दर्शकाद्वारे निर्मित सिनेमा प्रेक्षकापर्यंत सेन्सॉर बोर्डाच्या कात्रीनंतर येतो. १९५२ चा सिनेमॅटोग्राफ कायदा आणि १९८३ चा सिनेमॅटोग्राफी (प्रमाणीकरण) नियम हे भारतात प्रदर्शित होणारे चित्रपट जनहित, नैतिकता, शिष्टाचार, राष्ट्रीय एकात्मता व सार्वजनिक सुव्यवस्था यांना बाधा आणणारे नसावेत याची काळजी घेते. या कायद्यांतर्गत चित्रपटांना सेन्सॉर बोर्डाकडून योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येते, जेणेकरून प्रेक्षकांच्या वय व संवेदनशीलतेनुसार चित्रपटांचे प्रदर्शन नियंत्रित करता येईल. या प्रमाणपत्रामध्ये (U (Universal) सर्वांसाठी खुला, कोणत्याही वयोगटासाठी निर्बंध नाहीत, UA (Parental Guidance) १२ वर्षांखालील मुलांनी प्रौढांच्या सोबतीनेच पाहावा. A (Adult) फक्त १८ वर्षांवरील प्रेक्षकांसाठी, S (Special Class) - फक्त विशिष्ट व्यावसायिक/गटासाठी मर्यादित याचा समावेश असतो. सेन्सॉर बोर्डाकडून एकदा का प्रमाणपत्र मिळाले की ते चित्रपट प्रदर्शित केले जातात. एखाद्या चित्रपटास प्रमाणपत्र दिले नाही तर Film Certification -ppellate Tribunal (FCAT) इथे अपील करता येते. या शिवाय उच्च न्यायालयात रिट याचिका आणि त्यानंतर सर्वोच्च न्यायालयात अपील करता येते. एवढेच नाही तर, सेन्सॉर बोर्डाने खूप सुधारणा किंवा कट सुचविले तरी देखील न्यायालयात जाता येते. खूप वेळा जे प्रमाणपत्र दिले जाते त्याविरोधात देखील याचिका होते. K.A. Abbas v. Union of India (1970) या प्रकरणामध्ये सेन्सॉर बोर्डाने अब्बास यांच्या - "A Tale of Four Cities" या चित्रपटाला फक्त प्रौढांसाठी (A प्रमाणपत्र) देण्याचा निर्णय घेतला व काही दृश्ये कापण्याची अट घातली. त्याविरोधात केस दाखल झाली होती. अशी अनेक प्रकरणे आपणास माहीत आहेत.

परंतु अनेक वेळा सेन्सॉर बोर्डाने योग्य ते प्रमाणपत्र पारित केले असले तरी, जन-विरोध, कायदा आणि सुव्यवस्था, धार्मिक भावना दुखावल्या जाऊ शकतात किंवा इतिहासाची मोडतोड झाली या कारणास्तव केंद्र शासन किंवा राज्य शासन अशा चित्रपटावर त्यांच्या अधिकारक्षेत्रामध्ये बंदी घालू शकते. अशा बंदीविरोधात निर्माते न्यायालयात जातात. कधी कधी काही संघटना देखील सेन्सॉर बोर्डाने प्रमाणित केलेल्या चित्रपटावर बंदी आणावी म्हणून न्यायालयामध्ये केस दाखल करतात. अशाच काही मोजक्या न्यायालयीन प्रकरणांची चर्चा मी या लेखात करत आहे.

**आंधी (१९७५)**

१९७५ मध्ये प्रदर्शित झालेल्या 'आंधी' या भारतीय चित्रपटावर बंदी घालण्यात आली, कारण त्यात तत्कालीन प्रधानमंत्री इंदिरा गांधी यांच्या जीवनाशी साम्य असल्याचे मानले गेले. गुलजार दिग्दर्शित या चित्रपटात सुचित्रा सेन यांनी साकारलेली 'आरती देवी' ही राजकीय नेत्याची भूमिका इंदिरा गांधी यांच्याशी जोडली गेली, विशेषतः त्यांच्या साडीची शैली आणि केसांतील पांढऱ्या रेषेमुळे. चित्रपटाच्या जाहिरातींमध्ये

''तुमच्या पंतप्रधानांना पडद्यावर पाहा'' असा नारा वापरल्याने वाद वाढला. १३ फेब्रुवारी १९७५ रोजी प्रदर्शित झालेला हा चित्रपट आणीबाणीपूर्वीच्या (२५ जून १९७५) राजकीय अस्थिरतेत आला. गुजरातमधील विरोधी पक्षांनी आरती देवीच्या धूम्रपान आणि मद्यपानाच्या दृश्यांचा उपयोग काँग्रेस पक्षाच्या विरोधात प्रचारासाठी केला, ज्यामुळे ह्या चित्रपटास १२ जुलै १९७५ रोजी बंदी घालण्यात आली. आणीबाणीनंतर १९७७ मध्ये जनता पक्षाच्या सत्तेत येण्यावर बंदी उठवण्यात आली. गुलजार यांनी काही दृश्ये बदलून, इंदिरा गांधी यांच्याशी साम्य नसल्याचे स्पष्ट केले आणि चित्रपट पुन्हा प्रदर्शित झाला.

**किस्सा कुर्सी का (१९७७) :** 'किस्सा कुर्सी का' हा चित्रपट अमृत नाहटा यांनी बनवलेला राजकीय व्यंगचित्रपट होता. हा चित्रपट संजय गांधी आणि आणीबाणीच्या काळातील शासनावर तीव्र व्यंग व्यक्त करत होता. सेन्सॉर बोर्डाने या चित्रपटास प्रमाणपत्र देण्यास नकार दिला. रीव्हायझिंग कमिटीनेही चित्रपटात थेट राजकीय नेत्यांची खिल्ली उडवल्याचे सांगून प्रमाणपत्र नाकारले. केंद्र शासनाने देखील आणीबाणीच्या काळात संरक्षण नियम व आपत्कालीन अधिकारांचा वापर करून ह्या चित्रपटास कायम स्वरूपी बंदी घातली आणि या चित्रपटाच्या सर्व प्रती आणि निगेटिव्ह जप्त करून जाळल्या गेल्या. आणीबाणी संपल्यानंतर जनता सरकारने 'शाह आयोग' नेमून चौकशी केली आणि संबंधित व्यक्तींना शिक्षा केली; जी नंतर उच्च न्यायालयाने रद्द केली. आणीबाणी नंतर पुन्हा एकदा या सिनेमाचे शूटिंग करण्यात आले आणि १९७८ मध्ये याचे प्रदर्शन झाले.

**Ore Oru Gramathiley (१९८७) :** हा तमिळ चित्रपट १९८७ मध्ये प्रदर्शित झाला. या चित्रपटात शिक्षणातील आरक्षण धोरणावर टीका करण्यात आली होती. कथानकात नायिका खोटे जातीचे प्रमाणपत्र बनवून आरक्षणाचा फायदा घेते असे दाखवले होते. यामुळे आरक्षणविरोधी प्रचार होत असल्याचा आरोप करण्यात आला. तमिळनाडू सरकारने सांगितले की, हा चित्रपट समाजातील मागासवर्गीय आणि दलित विद्यार्थ्यांविरुद्ध द्वेष पसरवतो. या कारणास्तव राज्य सरकारने चित्रपटावर बंदी घातली. सर्वोच्च न्यायालयाने मात्र बंदी रद्द केली. पुढे सेन्सॉर बोर्डाच्या परवानगीनंतर हा चित्रपट प्रदर्शित झाला.

**दा विंची कोड (२००६) :** अमेरिकत प्रदर्शित झालेला The Da Vinci Code ह्या चित्रपटास भारतामध्ये, विशेषतः काही राज्यांमध्ये जसे पंजाब, नागालँड, मेघालय, तमिळनाडू विरोध झाल्यामुळे काही राज्यांनी यावर बंदी घातली. काही ख्रिस्ती संघटनांनी हा चित्रपट येशू ख्रिस्त आणि चर्चविषयी वादग्रस्त सिद्धांत दाखवतो म्हणून तीव्र विरोध केला. त्यांनी धार्मिक भावना दुखावल्या जात असल्याचा आरोप केला. मात्र केंद्रीय चित्रपट प्रमाणपत्र मंडळाने (CBFC) चित्रपट पाहून त्याला 'A' प्रमाणपत्र दिले. सेन्सॉर मंडळाने अट घातली की चित्रपटाच्या सुरुवातीस 'ही काल्पनिक कथा आहे' असा स्पष्ट डिस्क्लेमर दाखवावा. माहिती व प्रसारण मंत्रालयानेही हा निर्णय मान्य केला आणि राष्ट्रीय स्तरावर बंदी घालण्यास नकार दिला. तमिळनाडू शासनाच्या बंदीला मद्रास उच्च न्यायालय आणि त्यानंतर सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले होते. यात न्यायालयाने म्हटले की, एकदा सेन्सॉर मंडळाने प्रमाणपत्र दिल्यावर, केवळ आक्षेप किंवा भीतीच्या कारणाने राज्ये मनमानी पद्धतीने बंदी घालू शकत नाहीत.

**जोधा-अकबर (२००८) आणि पद्मावत (२०१८) :**

'जोधा-अकबर' चित्रपटाला राजपूत संघटनांनी इतिहासाचे विकृत चित्रण केल्याचा आरोप करून विरोध केला. या चित्रपटाने राजपूत इतिहासाचे महत्त्व कमी केले आणि राजकीय हेतूने इतिहास बदलल्याचा दावा संघटनांनी केला. निदर्शने आणि हिंसाचाराच्या धमक्यांमुळे

राजस्थान, उत्तर प्रदेश, हरयाणा, उत्तराखंड आणि मध्य प्रदेश या राज्यांनी कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी चित्रपटावर बंदी घातली. निर्माता UTV मोशन पिक्चर्सने न्यायालयात धाव घेतली आणि मध्य प्रदेश उच्च न्यायालयाने UTV Software Communication vs State Of Madhya Pradesh (AIR २००८ MP १७७) या प्रकरणात बंदी उठवली, तर सर्वोच्च न्यायालयाने उत्तर प्रदेश, हरयाणा आणि उत्तराखंडच्या काही भागांतील बंदी अंतरिम आदेशाने हटवली. न्यायालयाने कलात्मक स्वातंत्र्य आणि सेन्सॉर बोर्डाच्या मंजुरीला प्राधान्य दिले, ज्यामुळे चित्रपट बहुतेक राज्यांत प्रदर्शित झाला, परंतु राजस्थानात विरोध कायम राहिला.

'पद्मावत' चित्रपटाला करणी सेना आणि इतर राजपूत संघटनांनी तीव्र विरोध केला, कारण त्यात राणी पद्मावती आणि अलाउद्दीन खिलजी यांच्यातील कथित प्रेमप्रसंगाचे दृश्य आहे आणि 'राजपूत इतिहासाचा अवमान केला गेला' असा दावा त्यांनी केला. निर्मात्यांनी असे दृश्य नसल्याचे स्पष्ट केले असले, तरी विरोध कायम होता. चित्रपटाने जौहर आणि खिलजी यांचे चुकीचे चित्रण केल्याचा आरोपही झाला, ज्यामुळे राजस्थान, गुजरात, मध्य प्रदेश आणि हरियाणा या राज्यांनी जानेवारी २०१८ मध्ये कायदा व सुव्यवस्थेच्या कारणास्तव चित्रपटावर बंदी घातली. सर्वोच्च न्यायालयाने Viacom 18 Media Pvt. Ltd. vs. State of Rajasthan या केसमध्ये सदर बंदी योग्य नसल्याचे सांगून बंदी उठवली. चित्रपटाला सेन्सॉर बोर्डाने मंजुरी दिली होती आणि 'राज्यांचे बंधन घटनेच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या हक्काचे उल्लंघन केले आहे' असे मत न्यायालयाने नोंदविले. या चित्रपटाचे नाव अगोदर 'पद्मावती' होते जे विरोधानंतर 'पद्मावत' करण्यात आले.

अशाच प्रकारे देशद्रोही (२००८) आरक्षण (२०११) विश्वरूपम (२०१३) केरळ स्टोरी (२०२३) आणि उदयपूर फाइल्स (२०२५) या चित्रपटांना देखील काही राज्यांनी 'प्रांतवाद, संप्रदायिकता, जातीवाद वाढून समाजात वाद होऊ शकतील' अशा कारणास्तव बंदी केली. ह्या सगळ्या चित्रपटांवरील बंदी विविध अटी घालून न्यायालयाने उठवली. 'कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होईल या कारणास्तव चित्रपटास बंदी घालता येत नाही' असे मत न्यायालयांनी वेळोवेळी नोंदविले.

अशाच प्रकारे काही चित्रपटांना सेन्सॉर बोर्डाचे प्रमाणपत्र मिळूनसुद्धा न्यायालयीन कारवाईमुळे त्यांच्या प्रदर्शनाला अडथळा निर्माण झाल्याची काही उदाहरणे आहेत.

**बंडिट क्वीन (१९९४-९६) :** राज्यसभेच्या माजी खासदार फूलन देवी यांच्या जीवनावर आधारित या चित्रपटाला सेन्सॉर बोर्डाने प्रमाणपत्र दिले होते. परंतु फूलन देवी यांनी दिल्ली उच्च न्यायालयात याचिका दाखल करून सांगितले की 'या चित्रपटात त्यांच्या खासगी आयुष्याचे चुकीचे आणि अपमानास्पद चित्रण केले आहे, ज्यामुळे त्यांच्या गोपनीयतेचा व सन्मानाचा भंग झाला आहे.' दिल्ली उच्च न्यायालयाने प्रदर्शनावर स्थगिती दिली. मात्र सर्वोच्च न्यायालयाने १९९६ मध्ये स्थगिती उठवून अभिव्यक्ती स्वातंत्र्याला प्राधान्य दिले व चित्रपट प्रदर्शित झाला.

**ब्लॅक फ्रायडे (२००४-०७) :** १९९३ च्या मुंबई बॉम्बस्फोटांवर आधारित या चित्रपटाला प्रमाणपत्र मिळाल्यानंतर मुंबई उच्च न्यायालयाने प्रदर्शन थांबवले. कारण त्या वेळी मुंबई बॉम्बस्फोटांचा खटला न्यायालयात प्रलंबित होता आणि 'चित्रपटामुळे न्यायप्रक्रियेवर परिणाम होऊ शकतो' अशी भीती व्यक्त केली गेली. त्यामुळे जवळपास तीन वर्षे चित्रपट पडद्यावर आला नाही. नंतर जेव्हा खटल्याची महत्त्वाची टप्पे पूर्ण झाली, तेव्हा सर्वोच्च न्यायालयाने स्थगिती उठवली आणि २००७ मध्ये चित्रपट प्रदर्शित झाला.

**जॉली LLB 2 (२०१७):** या चित्रपटात काही प्रसंग न्यायव्यवस्थेची खिल्ली उडवतात आणि न्यायालयाचा अवमान होईल अशी तक्रार करण्यात आली. मुंबई उच्च न्यायालयाने काही दृश्ये व संवाद वगळण्याचा आदेश दिला आणि त्यासाठी विशेष समितीची नेमणूक केली. आवश्यक बदल केल्यानंतरच चित्रपट प्रदर्शित करण्याची परवानगी देण्यात आली.

भारतीय न्यायालयाने अनेकदा स्पष्ट केले आहे की, 'चित्रपट हे अभिव्यक्तीचे साधन असून ते संविधानातील अनुच्छेद १९(१)(अ) अंतर्गत संरक्षित मूलभूत अधिकार आहे. एकदा केंद्रीय चित्रपट प्रमाणपत्र मंडळाने (CBFC) चित्रपटास प्रमाणपत्र दिल्यानंतर केंद्र किंवा राज्य सरकारांनी त्यावर बंदी घालणे योग्य नाही. राज्याचे खरे कर्तव्य हे कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवणी आहे. केवळ काही व्यक्तींना किंवा गटांना कथानक आक्षेपार्ह वाटल्याने, संपूर्ण समाजाला चित्रपट पाहण्यापासून वंचित करता येत नाही,' असे न्यायालयाने ठळकपणे सांगितले. तसेच, अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर निर्बंध फक्त संविधानाच्या अनुच्छेद १९ (२) मध्ये दिलेल्या कारणांपुरतेच मर्यादित असले पाहिजेत, जसे की राष्ट्रसुरक्षा, सार्वजनिक सुव्यवस्था, नैतिकता, मानहानी किंवा न्यायालयाचा अवमान. राज्य सरकारे समांतर सेन्सॉर म्हणून वागू शकत नाही. तसेच, न्यायालयेही सेन्सॉर मंडळाचे अपील प्राधिकरण म्हणून काम करू नये. न्यायालयीन हस्तक्षेप फक्त अत्यावश्यक आणि गंभीर कायदेशीर कारण अस्तित्वात असल्यासच केला जाऊ द्यावा.

**– प्रा. विनोद एच. वाघ**
सहाय्यक प्राध्यापक
विप्रंमचे टीएमसी विधी महाविद्यालय,
ठाणे

•••

(पृष्ठ क्र. १६ वरून – **उंटांची अद्भूत रम्य दुनिया २०२४ हे आंतरराष्ट्रीय कॅमेलीड्सचे वर्ष**)

पाळणाऱ्यांना जास्तीचे उत्पन्न देईल आणि त्याद्वारे त्यांना केवळ त्यांच्या आश्चर्यकारक प्राण्यांवर अवलंबून राहण्याची गरज राहणार नाही.

नोव्हेंबर २०१३ मध्ये त्यांनी, 'कुंभलगडचे उंट' नावाच्या छोट्या पुस्तिकेचा शुभारंभ साजरा केला. ते नॅशनल रिसर्च सेंटरचे संचालक Dr. N. V. Patil यांनी प्रकाशित केले. ते नेहमीच सेवाभावी संस्थांनी केलेल्या कामाला सहाय्य देतात.

कुंभलगड अभयारण्याचे नॅशनल पार्कमध्ये रुपांतराच्या चर्चेने त्यांच्या कित्येक रात्री झोपेशिवाय गेल्या. या एका निर्णयाने संपूर्ण नाही पण, चराईवर जास्त निर्बंध येतील व हे लतादा व अंजी– की– धानी आणि गावातील त्यांच्या रायकांच्या गुराढोरांसाठी मृत्यूची घंटा असेल. हे थांबविण्यासाठी ते सर्वतोपरी प्रयत्न करत होते. वन्यजीव आणि उंट, तसेच इतर पशुधन, सहजीवन जगू शकतात आणि खरं तर हे सहअस्तित्व संरक्षित केले गेलेल्या, बिबट्या व लांडगा इ. भक्षकांसाठी फायदेशीर ठरू शकते.

२०१४ साली वसुंधरा राजेचे सरकार स्थापन झाले व राजस्थानच्या विधानसभेने ३० जून २०१४ रोजी, 'उंट राज्य प्राणी' म्हणून घोषित केले व अनेक संरक्षणात्मक उपाय मान्य केले. पण इथे राजस्थानच्या उंटांची गोष्ट संपली नाही; तर ते एका नवीन चक्रात सापडले व या शानदार प्राण्याचा नवीन अवतारात पुनर्जन्म झाला.

**– सौ. अल्पना बापट**
डॉ. बापट हॉस्पिटल
ठाणे
भ्रमणध्वनी – ९८३३०२९३५६

•••

# चित्रकार दीनानाथ दलाल : चित्र आणि चरित्र

*चंद्रशेखर टिळक यांनी हलक्या-फुलक्या लेखन शैलीनुसार परंतु मनोनिष्ठ विचारधारेतून; सुहास बहुळकरांचे चित्रकार दीनानाथ दलालांविषयीचे पुस्तक वाचून कलाकाराची गुणग्राहकता व्यक्त केली आहे - संपादक*

ज्येष्ठ शिल्पकार, चित्रकार, संशोधक सुहास बहुळकर यांचे राजहंस प्रकाशनने १५ जानेवारी २०२२ रोजी प्रकाशित केलेले ३९२ पानी (किंमत ६०० रुपये) 'चित्रकार दीनानाथ दलाल : चित्र आणि चरित्र'ग हे पुस्तक वाचून पूर्ण करून खाली ठेवत असताना माझ्या मनात उमटलेली पहिली प्रतिक्रिया होती. ....

'दीनानाथ' या नावातच काहीतरी जादू आहे हे नक्की ! आणि

दुसरी प्रतिक्रिया होती की, 'दीनानाथ मंगेशकर आणि दीनानाथ दलाल' यांच्यात साम्य किती आणि फरक कीती ?

या पुस्तकाच्या पहिल्याच पानावर राजा रविवर्मा आणि दीनानाथ दलाल यांची तुलना आली असली तरी माझ्या वेडगळ डोक्यात मात्र दीनानाथ दलाल आणि दीनानाथ मंगेशकर हीच तुलना ...

दोघांचेही पहिले नाव 'दीनानाथ' हे साम्य

दोघेही गोव्याचे हे साम्य

दोघांनाही चार मुली हे साम्य ( दीनानाथ मंगेशकर यांच्या लता मंगेशकर, आशा भोसले, मीना खडीकर, उषा मंगेशकर; तर दीनानाथ दलाल यांच्या अरुणा कारे, प्रतिमा वैद्य, मीरा कर्णिक, अमिता राजाध्यक्ष)

दोघेही 'कलाकार' हे साम्य.

पण दोघांचाही काळ वेगळा ...

कारण दीनानाथ मंगेशकर यांचा जन्म २९ डिसेंबर १९०० चा व मृत्यू २४ एप्रिल १९४२ चा ;

तर दीनानाथ दलाल यांचा जन्म ३० मे १९१६ चा तर मृत्यू १५ जानेवारी १९७१ ! तसेच

दोघेही कलाकार असले तरी त्यांचे कलाक्षेत्र वेगवेगळे.

पण एक मात्र नक्कीच की, या दोघांची तुलना हा विचार डोक्यात फिरायला लागल्यापासून या पुस्तकाचे प्रत्येक पान वाचताना मनोमन ही तुलना होत राहिली.

'आवाज' या गाजत्या मराठी दिवाळी अंकात घडी चित्र परंपरा सुरू करणारे दीनानाथ दलाल ...

१९४५ मधे रॉय किणीकर (उत्तररात्र) यांच्या सोबत 'दीपावली' मासिक सुरू करणारे दीनानाथ दलाल.

या पुस्तकाच्या पहिल्याच पानावर येणारे अत्यंत प्रखर वास्तव असणारे विधान हे पुस्तक लक्ष देऊनच वाचले पाहिजे असे बजावत राहाते. ते विधान म्हणजे-

**मराठी माणसाला जेवढं साहित्य, संगीत किंवा नाटकाचं प्रेम आहे, तेवढे चित्र - शिल्पकलेचे नाही.**

अशी तुलना मनात होत असली तरी सुहास बहुळकर यांनी पुस्तकात सर्वत्र दीनानाथ दलाल यांची सांगितलेली वैशिष्ट्ये मनात घर करून रहातात.....

- भरपूर परिश्रम, विलक्षण स्मरणशक्ती, निरीक्षण-शक्ती, वेग आणि कौशल्य म्हणजे दीनानाथ दलाल.
- चित्रं काढण्याबरोबरच त्याला चपखल शीर्षक देणे ही दलालांची खासियत.
- निसर्गचित्र, व्यक्तिचित्र, प्रसंगचित्र, रचनाचित्र अशा अनेक प्रकारची चित्रनिर्मिती म्हणजे दीनानाथ दलाल.

- कामाचा विलक्षण झपाटा आणि हाती घेतलेले काम चटकन हातावेगळे करण्याची सवय म्हणजे दीनानाथ दलाल.
- दीनानाथ दलाल त्याकाळी प्रचलित असलेली पेन, पेन्सिल, शाई, जलरंग, पोस्टर कलर्स अशी सर्वच माध्यमे उत्तम हाताळत. तैलरंग मात्र कमीच वापरत. कारण त्या माध्यमाची गरज अधिक वेळाची असे. (मात्र त्यांची मोठी मुलगी जे. जे. मधे तिसऱ्या वर्षाला शिकत असताना धाकट्या मुलीला मॉडेल म्हणून बसवून तैलरंगातील चित्रणाचे प्रात्यक्षिक दिल्याचा उल्लेख या पुस्तकाच्या सुरुवातीच्या पानात आला आहे.)
- व्यावसायिक कामातही प्रयोगशीलता म्हणजे दीनानाथ दलाल.
- दलालांनी अभिजात चित्रनिर्मितीसोबतच विविध प्रकारची चित्रनिर्मिती केली व अशी भरपूर चित्रं उपलब्ध आहेत... त्यात दलाल यांच्या कुटुंबीयांनी घेतलेली खबरदारी फार महत्त्वाची आहे. कारण हे भाग्य अगदी मोजक्या भारतीय, त्यातही मराठी, कलाकारांच्या नशीबी आले आहे.
- स्केचिंग व त्याचा अविभाज्य भाग असलेल्या रेषेचा सातत्यानं लालित्यपूर्ण व वैविध्यपूर्ण वापर म्हणजे दलालांची कलाकारकिर्द.
- निरीक्षणशक्ती, आरेखनातील कौशल्य, माध्यमा-वरील प्रभुत्व आणि प्रयोगशीलता म्हणजे दीनानाथ दलाल.
- केवळ शास्त्रशुद्ध अभ्यास म्हणजे व्यक्तिचित्र नसते याचा वस्तुपाठ म्हणजे दीनानाथ दलाल.
- कलाप्रदर्शन ही कलाकृती प्रदर्शित करून लौकिक मिळवण्याची जागा नव्हे हे मनोमन जाणलेला कलाकार म्हणजे दीनानाथ दलाल. (का कोण जाणे, हे या पुस्तकात वाचले आणि मला मराठी साहित्य संमेलन आठवायला लागले आणि अलीकडच्या काळातील एक शपथविधी ....)
- अभिजात किंवा व्यावसायिक कलानिर्मितीत कधीच एकाच शैलीला चिकटून न बसलेला कलाकार म्हणजे दीनानाथ दलाल.

पुस्तकभर पसरलेली दीनानाथ दलाल यांची ही सगळी कार्यवैशिष्ट्ये मनोमन नोंदवली जात असताना सहज मनात आले की, हे सगळे सद्गुण सेवा क्षेत्राच्या प्राबल्याच्या जमान्यात अंगी बाणवत राहणे अत्यावश्यक आहे.

या पुस्तकातले अत्यंत महत्त्वाचे पान म्हणजे पान क्रमांक १५.

या पानावर सुहास बहुळकर यांनी कलावंत आणि त्याचा/तिचा कलाप्रवास याबाबत 'जयमंगला' या कामसूत्रावरील एका संस्कृत श्लोकाचा उल्लेख करत केलेले विवेचन हे अगदी प्रत्येकाने मुळातून वाचावे असेच आहे.

हे पुस्तक वाचताना चित्रकलेच्या संदर्भात झालेल्या श्लील - अश्लील वादाचा साद्यंत इतिहास वाचायला मिळतो. तो वाचताना १९७० च्या दशकाच्या उत्तरार्धात 'अश्लीलता : एक परिसंवाद' ही पुस्तिका खूप गाजत होती त्याची हमखास आठवण होते.

**एक छोटी गंमत ....**

१. या पुस्तकात दलालांना व्यावसायिक कामाच्या रगाड्यामुळे व्यक्तीचित्रण करायला वेळ मिळत नसे. तरीही ते प्रसंगी करत असत आणि विविध स्पर्धांत अशी व्यक्तिचित्रणात्मक चित्रे पाठवत असतं आणि त्यांच्या अशा चित्रांना बक्षिसेही मिळत असतं हा उल्लेख अक्षरशः असंख्य वेळा येतो.

२. या पुस्तकात 'चपखल' हा शब्द एकापेक्षा जास्त वेळा येतो आणि तो प्रत्येक वेळी 'चपखळ' असा छापला आहे.

सुहास बहुळकर यांच्या एका पुस्तकाने मला 'आकारवर्तन' हा शब्द परिचित केला होता; तर आता या पुस्तकाने 'चित्रोद्यमा' हा शब्द ! 'चरितार्थासाठी कला की कलेचा चरितार्थ' या सनातन वादाचे वर्णन या एका शब्दात करता येईल का ?

योगायोगाने आत्ता आधी साधना बहुळकर यांचे एक (स्त्री चित्रकार) आणि सुहास बहुळकर यांची तीन (करमरकर, देऊसकर, दलाल) अशी ४ पुस्तके एकापाठोपाठ एक अशी मी वाचली. आणि कुठेतरी जी भावना या कलाकारांबाबत मनात ठळकपणे उभी राहिली तीच भावना या पुस्तकाच्या अर्पण पत्रिकेत सुहास बहुळकर लिहितात... "It is not a Creative Ecastacy; But An Abortive Agony...."

आणि तरीही

हे पुस्तक वाचत असताना सतत जाणवत राहिले की, चित्रकला हे क्षेत्र आणि चित्रकार ही जमात सर्वसामान्य माणसांपर्यंत ज्यांनी केवळ पोचवली असे नाही, तर ते क्षेत्र सर्वसामान्यांच्या मनाला भिडले असे काम करणारे चित्रकार म्हणजे दीनानाथ दलाल.

सहज मनात आले की, दीनानाथ दलाल हे भारतीय चित्रकलेचे 'अटलबिहारी वाजपेयी' आहेत आणि अटलबिहारी वाजपेयी हे भारतीय राजकारणाचे 'दीनानाथ दलाल' आहेत. की,

अटलबिहारी वाजपेयी (अटलजी) आणि दीनानाथ दलाल हे दोघेही AYN RAND च्या The Fountainhead मधले हॉवर्ड रोआरक आहेत ?...

– **चन्द्रशेखर टिळक**
सी-४०२, राज पार्क, मढवी बंगल्याजवळ,
राजाजी पथ, डोंबिवली (पूर्व), पिन – ४२१२०१
भ्रमणध्वनी – ९८२०२९२३७६

●●●

(पृष्ठ क्र. ५ वरून – **जागतिक वारसा स्थळ नामांकित गड किल्ल्यांचा परिचय – किल्ले तोरणा**)

ठेवले. या बारा किल्ल्यांत तोरण्याच्या समावेश होता. औरंगजेब इ.स. १७०४ मध्ये दक्षिण जिंकण्यास आला. १० मार्च १७०४ च्या रात्री काही मोगल सैन्य दोराच्या सहाय्याने तटावर चढून गेले. मराठ्यांना या हल्ल्याची कल्पना नव्हती. लढाई होऊन गड मोगलांकडे गेला. औरंगजेबाने गडाचे नांव 'फुतुहुल्घैब' असे ठेवले. या दक्षिण मोहिमेत मोगलांना व औरंगजेबाला लढून मिळालेला हा एकमेव विजय होता. या दिवशी औरंगजेबाचा एकोणनव्वदावा वाढदिवस होता.



रोहिडेश्वर व तोरणा हे किल्ले शिवबांनी स्वराज्यात आणले, ते स्वयंस्फूर्त जनता-जनार्दनाच्या सहाय्याने! यात कुणीही राजा नव्हता की सरदार! शिवबांनी स्वप्न दाखवले आणि इतरांनी ते उचलून धरले. रोहिडेश्वर घेतांना मंदिराची आणखी वाताहत होऊ नये ही काळजी, तर तोरणा व रोहिडेश्वराची तटबंदी दुरुस्ती, गाफिल न राहता आपले संरक्षण मजबूत ठेवणे ही दूरदृष्टी आणि या दोन्ही विजयात बायाबापड्यांना दिलेले अभय हे त्यांचे स्त्रीदाक्षिण्य आदी शिवबाराजेंचे महत्त्वाचे सद्गुण दर्शवतात.

– **दिलीप नारायण वंडलकर**
४, नरकेसरी सोसायटी, उज्ज्वलनगर,
वर्धा रोड, नागपूर – ४४००२५
मो.नं.: ९८३४६३६६५५
इ-मेल – dilipwandalkargmail.com

# परिसर वार्ता

**– संकलित**

## सौ. आनंदीबाई जोशी इंग्रजी माध्यमिक विभाग

**शाळेचे वार्षिक स्नेहसंमेलन कलापर्व २०२५ चे दिमाखदार सादरीकरण –**

शाळेचे वार्षिक स्नेहसंमेलन दिनांक १८ डिसेंबर गुरुवार रोजी शाळेच्या विद्यालंकार सभागृहात दिमाखात पार पडले.

या समारंभाच्या प्रमुख पाहुण्या म्हणुन शाळेच्या माजी विद्यार्थिनी CA नम्रता दिवेकर यांना आमंत्रित करण्यात आले होते. नम्रता दिवेकर या टाटा मोटर्स येथे वरीष्ठ महाव्यवस्थापक आणि व्यवसाय वित्त प्रमुख म्हणून कार्यान्वित आहेत.

याप्रसंगी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी असलेले डॉ. सुधाकर आगरकर, शाळेच्या मुख्याध्यापिका डॉ. अस्मिता मोहिले आणि प्रमुख पाहुण्या सीए नम्रता दिवेकर यांच्या हस्ते दीप प्रज्वलन पार पडले. शाळेच्या पर्यवेक्षिका निवेदिता दुर्वे यांनी समस्त मान्यवरांचे स्वागत केले.

मुख्याध्यापिकांनी विद्यार्थ्यांच्या शालेय आणि इतर सह अभ्यासक्रम एक्स्ट्रा करिक्युलम ॲक्टिव्हिटीचा वार्षिक अहवाल सगळ्यांसमोर सादर केला.

नम्रता दिवेकर यांनी समस्त विद्यार्थ्यांना उद्देशून त्यांच्या शालेय जीवनातील अनुभवांचे कथन केले. तसेच, त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी मोलाचे असे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना कळेल अशा सहज सोप्प्या शब्दांमधून केले. यावेळेस वार्षिक बक्षीस वितरण समारंभ प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते पार पडला.

ह्या वर्षीची ह्या स्नेहसंमेलनाची संकल्पना 'आशा/होप' अशी होती. सकाळी ९.३० वाजता या वार्षिक स्नेहसंमेलनाची सुरवात श्री गणेशाला नृत्यरूपी वंदना देऊन करण्यात आली.



यावर्षी प्रथमच रंगमंचावर भव्य अशा डिजिटल स्क्रीनची उभारणी करण्यात आली होती. नृत्य, गायन, वादन, नाट्य कलेचा अविष्कार जेव्हा रंगमंचावर सुरू होता त्या वेळेस या डिजिटल स्क्रीन वर त्यास अनुसरून अशी चित्रफीत दाखविण्यात येत होती.त्यामुळे या सेहसंमेलनाला पारंपरिके सोबत एक वेगळीच अशी अत्याधुनिक किनार लाभली गेली. पालक आणि विद्यार्थी अगदी तल्लीन होऊन या सोहळ्याचा अनुभव 'याची देही याची डोळा' घेत होते.





'आशा' या संकल्पनेला अनुसरून इयत्ता ५वी ते ९वी च्या विद्यार्थ्यांनी नृत्य, गायन, वादन, नाट्य आदी कलांमार्फत आपल्या कलागुणांची झलक सादर करून या संकल्पनेला प्रत्यक्षात परिपूर्ण केले.



या कार्यक्रमाची सांगता विद्यार्थ्यांनी संपूर्ण वन्दे मातरम् गावून केली.



**शाळेचा वार्षिक क्रीडा महोत्सव व्हेलॉसिटी २०२५ जल्लोषात सादर –**

शाळेचा दिनांक २३ डिसेंबर रोजी इयत्ता ५वी ते ७वी च्या विद्यार्थ्यांचा आणि २४ डिसेंबर रोजी इयत्ता ८ वी आणि ९ वीच्या विद्यार्थ्यांचा वार्षिक क्रीडा महोत्सव ठाणे येथील विद्या प्रसारक मंडळाच्या सुप्रसिद्ध अशा ठाणे महाविद्यालयाच्या अत्याधुनिक अशा टर्फ वर पार पडला. ह्या वर्षीपासून शाळेचा क्रीडा महोत्सव 'व्हेलॉसिटी' या नावाने संबोधला जाणार आहे.

२३ तारखेला शाळेच्या मुख्याध्यापिका डॉ. अस्मिता मोहिले यांनी ध्वजारोहण करून या क्रीडा महोत्सवाचे उद्घाटन केले.



त्या नंतर इयत्ता सहावी ते नववीच्या सन, व्हिनस, मरक्यूरी, ज्यूपीटर ह्या वेगवेगळ्या हाऊस ग्रुपच्या विद्यार्थ्यांनी माननीय मुख्याध्यापिकांना मानवंदना देऊन शिस्तबद्ध पद्धतीने परेड सादर केली.



ए के जे व्हेलॉसिटी अशा पद्धतीने लिहिलेल्या अक्षरांची सुंदर गुंफण रंगीत फुग्यांच्या मार्फत आकाशात

सोडण्यात आली. उपस्थित विद्यार्थ्यांना हे पाहून खूपच आनंद झाला.

या क्रीडा महोत्सवात इयत्ता ५वी ते ७ वी च्या विद्यार्थ्यांसाठी गोळाफेक, उभी लांब उडी, ६० मीटर आणि १५० मीटर धावणे, अडथळ्यांची शर्यत, रिले अशा विविध प्रकारच्या शर्यतींचा समावेश होता.



तसेच इयत्ता ८वी आणि ९वी च्या विद्यार्थ्यांसाठी गोळा फेक, ६० मीटर आणि ३०० मीटर धावणे, लांब उडी, रिले आणि सगळ्यांच्या आवडीचा रस्सीखेच अशा विविध प्रकारच्या शर्यतींचा समावेश होता.

विद्यार्थ्यांनी सुद्धा अगदी उत्स्फूर्तपणे यात भाग घेऊन खिलाडू वृत्तीने प्रदर्शन केले.

यावेळेस इयत्ता नववीच्या विद्यार्थ्यांसाठी एक आगळीवेगळी अशी फिटनेस सर्किट चैलेंज ही स्पर्धा आयोजित करण्यात आली होती, ह्यात १० मुलांनी आणि १० मुलींनी हिरीरिने सहभाग घेतला होता. ह्या स्पर्धेमध्ये धावणे, दोरीच्या उड्या मारणे, पुश-अप्स, सरतेशेवटी प्लॅन्क करणे अशा प्रकारच्या क्रीडा प्रकारांचा समावेश होता.

दोन्ही दिवशी बक्षीस समारंभ तेथेच पार पडला. समस्त विद्यार्थी गण आनंदाचे क्षण मनात साठवून घराकडे रवाना झाले.

## जोशी-बेडेकर कला व वाणिज्य महाविद्यालय (स्वायत्त)

पेनीवाईज-V : सामाजिक परिवर्तनासाठी क्राउडफंडिंग

B.Com/M.Com विभागातर्फे १३ डिसेंबर २०२५ रोजी 'पेनीवाईज-V' हा एकदिवसीय आंतरमहाविद्यालयीन परिसंवाद कात्यायन सभागृहात यशस्वीपणे पार पडला.

'सामाजिक परिवर्तनासाठी क्राउडफंडिंग' या विषयावर आधारित या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांना पर्यायी आर्थिक साधनांची ओळख करून देणे हा होता. इंडियन अकाउंटिंग असोसिएशन (ठाणेशाखा) यांच्या सहकार्याने आयोजित या परिसंवादाला विविध महाविद्यालयांतील २३७ विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग लाभला.

मान्यवर वक्त्यांनी सोप्या व वास्तव उदाहरणांतून क्राउडफंडिंग चे महत्त्व, सामाजिक उद्योजकतेची भूमिका आणि नैतिक निधी संकलन याबाबत मार्गदर्शन केले. हा परिसंवाद विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरला असून आर्थिक साक्षरता व सामाजिक जबाबदारीची जाणीव निर्माण करण्यात त्याचा मोलाचा वाटा राहिला.

**Soil Savvy : कचऱ्यातून संपत्तीकडे**

अकाउंटन्सी विभागातर्फे विद्यार्थ्यांसाठी Community Engagement Program (CEP) अंतर्गत 'Soil Savvy : Turning Waste into Wealth' या विषयावर कार्यशाळेचे आयोजन ८ डिसेंबर २०२५ रोजी करण्यात आले.

या कार्यशाळेत डॉ. माधुरी पेजावर यांनी विद्यार्थ्यांना मातीचे संवधन, कचऱ्याचे व्यवस्थापन व कंपोस्ट तयार करण्याबाबत सोप्या पद्धतीने मार्गदर्शन केले. कचऱ्यापासून उपयुक्त साधनांची निर्मिती कशी करता येते, तसेच त्यातून पर्यावरण संरक्षणासोबतच आर्थिक मूल्य कसे निर्माण होऊ शकते, याबाबत त्यांनी प्रात्यक्षिकांसह माहिती दिली.

या उपक्रमाला १८३ विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग लाभला. ही कार्यशाळा विद्यार्थ्यांसाठी अत्यंत उपयकुत ठरली असून पर्यावरणाविषयी जागरूकता निर्माण करण्यासोबतच जबाबदार नागरिकत्वाची भावना विकसित करण्यात तिने महत्त्वाची भूमिका बजावली.

**नवरंग २५**

नवरंग-२०२५ या महोत्सवात विद्यार्थ्यांच्या कलागुणांना मुक्त वाव देणाऱ्या विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. या महोत्सवात विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग भरभरून लाभला.

या अंतर्गत क्लिक मेनिआ (फोटोग्राफी), ऍड मेनिआ, मेहंदी स्पर्धा, हेअरस्टाईल स्पर्धा, कविता सादरीकरण स्पर्धा, वृत्त वाचन (न्यजू रीडिंग) स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, प्रश्नमजुंषा स्पर्धा अशा विविध स्पर्धा घेण्यात आल्या. प्रत्येक स्पर्धेत विद्यार्थ्यांनी आपली कल्पकता, सादरीकरण कौशल्य आणि आत्मविश्वास प्रभावीपणे सादर केला.

फोटोग्राफी आणि जाहिरात स्पर्धांमधून सर्जनशीलता व कल्पनाशक्ती दिसून आली, तर मेहेंदी व हेअरस्टाईल स्पर्धां मध्ये कलात्मक सौंदर्याची झलक पाहायला मिळाली. काव्यवाचन व न्यूज रीडिंग स्पर्धां मधनू विद्यार्थ्यांचा भाषेवरील प्रभुत्व, अभिव्यक्ती शक्ती आणि आत्मविश्वास अधोरेखित झाला.

मान्यवर परीक्षकांनी प्रत्येक स्पर्धेचे निष्पक्ष परीक्षण करून विजेत्यांची निवड केली. या सर्व उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्ववास वाढला, संघभावना निर्माण झाली आणि व्यासपीठावर आपली कला सादर करण्याचा अनुभव मिळाला.

एकूणच 'नवरंग २५' हा महोत्सव रंगतदार, उत्साही आणि विद्यार्थ्यांच्या बहुविध कलागुणांना उजाळा देणारा ठरला.

## विद्या प्रसारक मंडळाचे
## ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय

Arts, Theatre and Legal Literacy या कोर्सचे उद्घाटन

दिनांक २० नोव्हेंबर २०२५ रोजी, प्रथम विधीच्या प्रथम सत्रासाठी निर्माण केलेल्या Arts, Theatre and Legal Literacy या सर्टीफिकेट कोर्सचे उद्घाटन श्री. रवींद्र पाजनकर, ठाणे जिल्हा विधी सेवा प्रधिकरणाचे सचिव तथा दिवानी न्यायाधीश (वरिष्ठ स्तर) यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून मराठी सिनेमा अभिनेते तथा वकील निकेत मोरे उपस्थित होते. या कोर्सचे शिक्षक श्री. ओमकार सुब्रमण्यम अय्यर यावेळी उपस्थित होते.

प्राचार्या डॉ. श्रीविद्या जयकुमार यांनी प्रास्ताविक केले, तर या कोर्सचे कौऑर्डीनेटर विनोद एच वाघ यांनी कोर्सची माहिती दिली. यावेळी बोलताना श्री पाजनकर यांनी अशा कोर्सेसची आवश्यकता सांगितली व यामुळे विद्यार्थ्यांत होणारा सकारात्मक बदल यावर भाष्य केले. श्री. निकेत मोरे यांनी कलागुणामुळे आत्मविश्वास वाढण्यास कशी मदत होते याचे विवेचन केले. सूत्रसंचालन श्रीमती हेतल मिशेरी यांनी केले.





**'चला मित्र हो, उद्योगावर बोलू काही'**

दिनांक ५ डिसेंबर २०२५ रोजी Saturday Club आयोजित 'चला मित्रहो, उद्योगावर बोलू काही' या अवर्णनीय अशा सुंदर कार्यक्रमाला महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. श्रीविद्या जयकुमार यांच्या पुढाकाराने आणि प्राध्यापक श्री यतीन पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली प्रथम वर्षातील (FYLLB) विद्यार्थ्यांनीं हजेरी लावली.

संघटनेचे फाऊंडर दिवंगत श्री. माधवराव भिडे यांच्या स्मृतींना विनम्र अभिवादन आणि या अप्रतिम कार्यक्रमाला महाविद्यालयाला Saturday Club आणि डॉ. सुरेश हावरे सरांनी आवर्जून आमंत्रण दिलं त्याबद्दल VPMS TMC LAW College तर्फे संपूर्ण Saturday Club टीम चे मन:पूर्वक आभार. आभार यासाठीच कारण आकाशाला यशस्वी गवसणी घालण्यासाठी हवे असलेले बळ प्रत्येक व्यक्तीत असतं; मात्र ते योग्य वेळी ओळखून योग्य निर्णयासोबत वापरता आलं पाहिजे आणि ते कसे ओळखावं याचं अचूक मार्गदर्शन जिवंत उदाहरणं देऊन कार्यक्रमाच्या केंद्रस्थानी असलेल्या डॉ. सुरेश हावरे यांनी अगदी साध्या आणि सोप्या भाषेत समजावून सांगितले.

'उद्योजक हा देशाची संपत्ती निर्माण करणारा व्यक्ती असतो. उद्योजक होण्यासाठी इंग्रजी आले पाहिजे असे आवश्यक नाही' हे प्रगत देशांपैकी असलेल्या जपान या देशाचे उदाहरण देऊन ठामपणे डॉ. हावरे सरांनी पटवून दिले. उद्योगाच्या भाषेत 'Sorry, Thank you, क्या बात है (स्तुती करणे)' इत्यादी शब्द खूप मोठा सकारात्मक बदल घडवून आणतात हे 'प्रॉक्टर अँड गॅम्बल' या कंपनीचे उदाहरण देऊन डॉ. हावरे सरांनी शिक्कामोर्तब केलं.

आज आपल्यालाही नम्रपणाने आणि प्रामाणिकपणाने स्वतः सोबत देशाचा विकास करायचा आहे म्हणून त्यासाठी 'वाकेन, पण मोडणार नाही' असा आजच्या काळानुसार बदललेला आणि आजच्या काळाला गरजेचा असलेला मंत्र सरांनी दिला. त्याचं कारण म्हणजे आता आपण पेन, वही, मोबाईल घेऊन घरातून निघतो तलवार घेऊन नाही.. कारण तलवार त्याकाळात गरजेची होती, आजच्या काळात नाही. आणि कायद्याचे विद्यार्थी म्हणून हा मंत्र आपल्याला बरोबर लागू पडतो, कारण आधीच्या काळात राजेशाही परंपरा होती आणि आज आपण स्वतंत्र भारतात संविधानाने घालून दिलेल्या नियमांनुसार जीवनाचा आनंद घेत आहोत हे प्राध्यापक श्री यतीन पंडित सरांनी चर्चे दरम्यान समजावून सांगितले. म्हणून वकील हा पेशा असला तरी तो व्यवसायही आहे आणि आपला व्यवसाय हा प्रामाणिकपणे, तसेच कायद्याने नेमून दिलेल्या नियमांना धरून करणे हे तेवढेच महत्त्वाचे आहे असे प्राध्यापक श्री. यतीन पंडित सरांनी पटवून दिले. जर एखाद्या मोठ्या उद्योगपतीला अचानक भेटण्याची संधी मिळाली तर ३० सेकंदात स्वतःची प्रभावी ओळख कशी करून द्यायची याचे प्रात्यक्षिक देखील समोरासमोर पाहता आले. 'अपमान गिळा त्याला प्रत्युत्तर करू नका.. अपमानाचा राग न करता आपल्यातील दोष सुधारा आणि पुढे चला' असे प्रशांत कॉर्नरचे सर्वेसर्वा प्रशांत सकपाळ यांनी सांगितले. गरिबी एवढी की एक वेळ जेवणाचे हाल आणि आज २० करोडचे घर पण तरीही पाय मात्र जमिनीवर ठेवून चालणारा हा अवलिया (प्रशांत सकपाळ - प्रशांत कॉर्नर) प्रामाणिकपणा, आत्मविश्वास, चिकाटी आणि मेहनतीचे जिवंत उदाहरण आहे. जाता जाता काही कानमंत्र हावरे सरांनी दिले

१) जीवन हा एक प्रवास आहे आणि या प्रवासाचा आनंद जीवन जगतानाच घ्या.

२) ही वेळ सुद्धा जाईल म्हणून यश आल्यावर ते डोक्यात घेऊ नका नाहीतर हवेत उडाल आणि हवा

संपली की जोरात आपटाल म्हणून यश हृदयात असावं म्हणजे पाय जमिनीवर राहतील आणि अपयश डोक्यात असावं मगच यशस्वी व्हाल!

३) जीवनाला फार ताणू नका.. ते आहे तसेच जगा कारण ताणले तर तुटते.. म्हणून एकदाच मिळालेल्या या मोकळ्या जीवनाला मोकळेपणाने जगा म्हणजे अपयश पचविण्याची ताकत आणि यश टिकवण्याची कला आपोआप अंतरी निर्माण होते!



**काउन्सेलिंग सेंटर, यांच्यावतीने आयोजित प्रशिक्षण**

महाविद्यालयातील काउन्सेलिंग सेंटरतर्फे ०८ डिसेंबर २०२५ रोजी दुपारी १२:०० वाजता 'आत्महत्येचा धोका कमी करणे व विद्यार्थ्यांच्या मानसिक स्वास्थ्य वृद्धी' या विषयावर विशेष प्रशिक्षण सत्राचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे उद्दिष्ट युवकांमध्ये मानसिक आरोग्याच्या समस्यांबद्दल जागरूकता निर्माण करणे, तणावग्रस्त सहकाऱ्यांविषयी संवेदनशीलता वाढवणे आणि विद्यार्थ्यांना मूलभूत भावनिक सहाय्य देण्यासाठी सक्षम बनवणे हे होते.

**संसाधन व्यक्ती**

या सत्राचे मार्गदर्शन मुंबई येथील टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेस (TISS) मधील दोन रिसर्च सायंटिस्टनी केले :- मिस. नयोनिका, मिस. श्रीविद्या

**TISS विषयी माहिती**

टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेस (TISS) ची स्थापना १९३६ मध्ये झाली असून; सामाजिक विज्ञान, मानसिक आरोग्य संशोधन, सामाजिक कार्य, समुपदेशन आणि सार्वजनिक धोरण या क्षेत्रांतील भारतातील एक अग्रगण्य संस्था आहे. समुदाय विकास, युवक मानसिक स्वास्थ्य कार्यक्रम, क्षेत्राधारित संशोधन आणि पुराव्यावर आधारित हस्तक्षेप यासाठी TISS खूपच प्रसिद्ध आहे.

TISS मधील संसाधन व्यक्तींना मानसिक आरोग्य मूल्यांकन, आत्महत्येची जोखीम कमी करण्याच्या पद्धती, युवक समुपदेशन आणि पिअर सपोर्ट प्रशिक्षणाचा व्यापक अनुभव असल्यामुळे हे सत्र अत्यंत प्रभावी आणि विश्वासार्ह ठरले.

**सत्राची उद्दिष्टे**

१. युवकांमधील आत्महत्येच्या जोखीम घटक व इशारे समजावून देणे.

२. सहकाऱ्यांमधील तणाव व अडचणी ओळखण्या-साठी मूलभूत कौशल्ये विकसित करणे.

३. भावनिक प्रथमोपचार, संकट संवाद आणि तत्काळ मदत पद्धती शिकवणे.

४. मानसिक आरोग्याबाबत मदत घेण्याची भीती कमी करणे व सकारात्मक वातावरण तयार करणे.

५. महाविद्यालयात प्रथम प्रतिसाद देणारे पिअर सपोर्टर्स तयार करणे.

**सत्राचे प्रमुख मुद्दे**

- कार्यक्रमाची सुरुवात डॉ. रुपाली जामोदे यांच्या स्वागतपर भाषणाने झाली. त्यांनी महाविद्यालयात मानसिक आरोग्य संवेदनशीलतेची गरज अधोरेखित केली.
- प्राचार्या डॉ. श्रीविद्या जयकुमार यांनी विद्यार्थ्यांच्या कल्याण आणि भावनिक सक्षमीकरणाबाबत महाविद्यालयाची भूमिका स्पष्ट केली.

- TISS मधील तज्ज्ञांनी खालील विषयांवर संशोधनाधारित आणि संवादात्मक प्रशिक्षण दिले:
- विद्यार्थी समुदायातील मानसिक आरोग्य समस्या
- मनोवैज्ञानिक, भावनिक आणि वर्तणुकीतील तणाव संकेत ओळखणे
- संकट किंवा आत्महानीच्या लक्षणांवर तत्काळ पावले
- सहानुभूतीपूर्ण संवाद व सक्रिय ऐकण्याच्या कौशल्यांचा विकास
- तणाव व्यवस्थापन आणि पुनर्स्थापना (resilience) कौशल्ये सत्रात भूमिकानाट्य, केस स्टडीज आणि समूह-परस्परसंवाद यासारख्या उपक्रमांचा समावेश होता.

**डेटा संकलन आणि निष्कर्ष**

- सुमारे ६० विद्यार्थ्यांकडून मानसिक आरोग्याशी संबंधित माहिती संरचित साधनांद्वारे संकलित करण्यात आली.
- प्राथमिक निरीक्षणांतून असे दिसून आले की, विद्यार्थ्यांना अभ्यास, कौटुंबिक जबाबदाऱ्या, वैयक्तिक समस्या आणि सामाजिक दडपणामुळे तणावाचा सामना करावा लागत आहे.
- या डेटामधील निष्कर्ष काउन्सेलिंग सेंटरच्या कार्यक्षमता वाढवण्यासाठी उपयुक्त ठरतील.

**कार्यक्रमाचे परिणाम**

१. सुमारे ६० विद्यार्थ्यांना संरचित प्रशिक्षण देण्यात आले असून, ते आता प्राथमिक पिअर-हेल्पर्स म्हणून कार्य करण्यास सक्षम आहेत.

२. विद्यार्थ्यांना मानसिक आरोग्य समस्यांविषयी स्पष्टता मिळाली आणि लवकर मदत घेण्याचे महत्त्व समजले.

३. या उपक्रमातून महाविद्यालयात एक मजबूत पिअर सपोर्ट सिस्टम तयार होत आहे.

४. आत्महत्येची प्रतिबंधक उपाययोजना आणि मानसिक आरोग्य संसाधनांबाबत जागरूकता वाढली.

५. विद्यार्थ्यांच्या कल्याणासाठी केल्या जाणाऱ्या उपक्रमांमध्ये TISS आणि महाविद्यालयातील सहकार्य अधिक बळकट झाले.

**विद्यार्थ्यांच्या प्रतिक्रिया**

विद्यार्थ्यांनी सत्राबद्दल व्यक्त केलेल्या प्रतिक्रिया पुढीलप्रमाणे:

- अत्यंत माहितीपूर्ण आणि विचारप्रवर्तक
- समजण्यास सोपे, संवादात्मक आणि विद्यार्थ्यांसाठी अनुकूल
- वैयक्तिक भावनांना व्यक्त करण्यासाठी सुरक्षित वातावरण
- सहकाऱ्यांशी संबंधित वास्तविक परिस्थितींमध्ये उपयोगी

TISS मधील संसाधन व्यक्तींच्या संवादात्मक पद्धती, उदाहरणे आणि उघडे चर्चासत्र विद्यार्थ्यांना विशेष आवडले.

**निष्कर्ष**

'आत्महत्येचा धोका कमी करणे आणि विद्यार्थ्यांच्या मानसिक स्वास्थ्य वृद्धी' या विषयावरील हे प्रशिक्षण सत्र अत्यंत उपयुक्त आणि समयोचित ठरले. TISS सारख्या प्रतिष्ठित संस्थेतील तज्ज्ञ प्रशिक्षकांच्या उपस्थितीमुळे कार्यक्रमाची गुणवत्ता आणखी वाढली. विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता, करुणा आणि पिअर सपोर्ट देण्याची तयारी निर्माण करण्यास हा उपक्रम यशस्वी ठरला.





### आमचे माननीय कायदेतज्ज्ञ – माननीय न्यायमूर्ती अभय ओक

सन्माननीय न्यायमूर्ती अभय एस ओक यांना आमचे मानद प्राध्यापक म्हणून लाभल्याबद्दल आम्हाला खूप आनंद होत आहे. त्यांच्या सखोल कौशल्याने, उत्कृष्ट अनुभवाने आणि कायदेशीर शिक्षणाने आम्हाला मार्गदर्शन करतील. त्यांची उपस्थिती ही एक विशेषाधिकार आहे आणि आम्ही त्यांच्या अमूल्य अंतर्दृष्टी आणि ज्ञानाचा लाभ घेण्यास उत्सुक आहोत.




### आंतरराष्ट्रीय मानवाधिकार दिन जागरूकता कार्यक्रम १० डिसेंबर २०२५

वि प्र मं चे विधी महाविद्यालयाने १० डिसेंबर २०२५ रोजी ठाणे येथील डॉ. बेडेकर विद्यामंदिर शाळेत 'आंतरराष्ट्रीय मानवाधिकार दिन जागरूकता' कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडला, ज्याचा उद्देश शालेय विद्यार्थ्यांमध्ये मूलभूत मानवी हक्कांबद्दल जागरूकता निर्माण करणे होता.

कार्यक्रम दुपारी १:०० वाजता ७ वी च्या विद्यार्थ्यांच्या सहभागाने सुरू झाला, जे या विषयाबद्दल जाणून घेण्यासाठी उत्साही आणि उत्सुक होते. सत्राचे उद्घाटन सहाय्यक प्रा. चांदणी घोगरे यांनी केले, ज्यांनी विद्यार्थ्यांचे हार्दिक स्वागत केले आणि दैनंदिन जीवनात मानवी हक्कांची संकल्पना आणि महत्त्व थोडक्यात स्पष्ट केले. यानंतर, सहाय्यक प्रा. कृष्णा कामत यांनी विद्यार्थ्यांना संबोधित केले आणि व्हीपीएमएस टीएमसी लॉ कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या मानवी हक्कांवरील एका लघुकथेची ओळख करून दिली. या नाटकात विविध मानवी हक्क आणि वास्तविक जीवनातील परिस्थिती आकर्षक आणि विद्यार्थी-अनुकूल पद्धतीने प्रभावीपणे अधोरेखित करण्यात आल्या.

हे नाटक खालील विद्यार्थ्यांनी सादर केले:

अवधूत विरकर, अमित फडये, शीतल नाटेकर, श्रीनाथ शिंदे, सचिन अहिरे, श्रवण पवार.

कलाकारांनी एक उत्कृष्ट आणि प्रभावी नाटक सादर केले, ज्यामुळे शालेय विद्यार्थ्यांना मानवी हक्कांचे महत्त्व सोप्या आणि संबंधित पद्धतीने समजण्यास मदत झाली. सादरीकरणानंतर, सहाय्यक प्रा. कृष्णा कामत यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला आणि त्यांना स्किटद्वारे दिलेल्या संदेशाबद्दल त्यांचे मत आणि समज सामायिक करण्यास प्रोत्साहित केले. या संवादातून असे दिसून आले की, विद्यार्थ्यांनी मानवी हक्कांचे महत्त्व आणि प्रासंगिकता स्पष्टपणे समजून घेतली आहे. कार्यक्रमाच्या शेवटी डॉ. बेडेकर विद्यामंदिर शाळेच्या प्राचार्या श्रीमती वाघुले यांनी सत्रात सामील होऊन जागरूकता कार्यक्रमात मौल्यवान योगदान दिल्याबद्दल सहाय्यक प्रा. कृष्णा कामत आणि सहाय्यक प्रा. चांदणी घोगरे यांचा सत्कार

केला. कार्यक्रमाचा समारोप शाळेतील श्री. कोळी यांनी विशेष आभार मानून केला, ज्यांनी व्हीपीएमच्या टीएमसी लॉ कॉलेजच्या प्रयत्नांचे कौतुक केले आणि कार्यक्रमाचा सकारात्मक सारांश दिला. जागरूकता कार्यक्रम माहितीपूर्ण, संवादात्मक आणि तरुण विद्यार्थ्यांना मानवी हक्कांबद्दल संवेदनशील बनवण्याच्या उद्देशाने यशस्वी झाला.



**रिअल इस्टेट कायद्यातील प्रमाणपत्र कार्यक्रम**

१२ आणि १३ डिसेंबर रोजी वेळापत्रकानुसार रिअल इस्टेट कायद्यांची परीक्षा घेण्यात आली. २० विद्यार्थ्यांनी भाग घेतला. रिअल इस्टेट कायद्यातील प्रमाणपत्र कार्यक्रम समन्वयक आणि अतिरिक्त संसाधन व्यक्ती - डॉ श्री विद्या जयकुमार, संसाधन व्यक्ती : अधिवक्ता श्री दीपक शेगावकर. १२ आणि १३ डिसेंबर रोजी परीक्षा घेण्यात आल्या. १२ डिसेंबर रोजी - ५० गुणांसाठी लेखी परीक्षा घेण्यात आल्या तसेच १३ डिसेंबर रोजी - प्रोजेक्ट, वैवा (२५ गुण) - मूट कोर्ट/क्लायंट कौन्सिलिंग (२५ गुण) घेण्यात आल्या. निकाल फेब्रुवारीच्या पहिल्या आठवड्यात जाहीर होईल.

**रविवार, १४ डिसेंबर २०२५**

**विधी फाऊंडेशनची दिवंगत ॲड. प्रभाकर हेगडे व्याख्यानमाला**

१४ डिसेंबर रोजी डॉ. श्रीविद्या जयकुमार यांनी जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवनात महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसह व्याख्यानमालेत भाग घेतला. या कार्यक्रमात ज्येष्ठ वकील श्री. विजय साळी (माजी विद्यार्थी) आणि श्री. महेंद्र सिंग यांना जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायाधीश माननीय न्यायमूर्ती श्री. संदेश पाटील यांनी व्याख्यान दिले. या कार्यक्रमात आमचे मे २०२५ चे पास आउट माजी विद्यार्थी श्री. विवेक पाटील यांना आमच्या महाविद्यालयाचे सर्वोत्कृष्ट विद्यार्थी वकील म्हणून सन्मानित करण्यात आले. श्री. पाटील यांना त्यांच्या शैक्षणिक उत्कृष्टतेसह आदर, प्रामाणिक सहभाग आणि महाविद्यालयीन उपक्रमांमध्ये नेतृत्व यासाठी प्राचार्यांकडून नामांकन देण्यात आले.





**व्हीपीएम चॅम्पियनशिप शिल्डमध्ये एलएलबी आणि एलएलएम विद्यार्थ्यांचा सहभाग**

एलएलबी आणि एलएलएम विद्यार्थ्यांनी व्हीपीएम चॅम्पियनशिप शिल्डमध्ये सक्रिय सहभाग घेतला, फुटबॉल, क्रिकेट, बास्केटबॉल आणि पिकलबॉल सारख्या विविध खेळांमध्ये त्यांचा उत्साह आणि स्पर्धात्मक भावना दाखवली. जरी संघ स्पर्धेत विजेते म्हणून उदयास येऊ शकले नाहीत, तरी विद्यार्थ्यांनी संपूर्ण स्पर्धांमध्ये प्रशंसनीय समर्पण, टीमवर्क आणि लवचिकता दाखवली. मैदानावर आणि मैदानाबाहेर त्यांचे वर्तन अनुकरणीय क्रीडाभावना, परस्पर आदर आणि स्पर्धेबद्दल सकारात्मक दृष्टिकोन प्रतिबिंबित करते. कायद्याच्या विद्यार्थ्यांच्या सहभागाने आंतर-महाविद्यालयीन क्रीडा महोत्सवात

यश मिळवायचं असेल, तर त्यासाठी अपयशाला सामोरं जाण्याची तयारी ठेवा.

मोठी ऊर्जा भरली आणि शैक्षणिक उत्कृष्टतेसह शारीरिक तंदुरुस्ती, सौहार्द आणि चारित्र्य निर्माणाचे महत्त्व अधोरेखित केले.





**न्यायिक दंडाधिकारी प्रथम श्रेणी (JMFC) परीक्षेची तयारी आणि रणनीती**

महाविद्यालयाने शनिवार, २० डिसेंबर २०२५ रोजी मूट कोर्ट हॉल येथे न्यायिक दंडाधिकारी 'प्रथम श्रेणी (JMFC) परीक्षेची तयारी आणि रणनीती' या विषयावर एक कार्यशाळा यशस्वीरित्या आयोजित केली. या कार्यशाळेचे उद्दिष्ट JMFC परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी आवश्यक असलेले आवश्यक गुण, वृत्ती, कौशल्ये आणि ज्ञान विकसित करणे होते.



कार्यक्रमाची सुरुवात सहाय्यक प्रा. शिवाजी बिबे यांनी सूत्रसंचालन करून केली. त्यांनी मान्यवर, संसाधन व्यक्ती, प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांचे स्वागत केले. त्यांनी न्यायिक सेवांचे महत्त्व आणि इच्छुक न्यायिक अधिकाऱ्यांसाठी अशा कार्यशाळांची प्रासंगिकता थोडक्यात अधोरेखित केली. त्यानंतर, प्राचार्य डॉ. श्रीविद्या जयकुमार यांनी उपस्थितांना प्रोत्साहनपर भाषणे दिली. त्यांच्या भाषणात त्यांनी विद्यार्थ्यांना समर्पण, शिस्त आणि सचोटीने न्यायिक सेवा बजावण्यास प्रेरित केले. न्यायव्यवस्थेत यश मिळविण्यासाठी चिकाटी, सतत शिक्षण आणि नैतिक जबाबदारीची भूमिका त्यांनी अधोरेखित केली आणि अशा अर्थपूर्ण शैक्षणिक उपक्रमाचे आयोजन करण्यात प्राध्यापकांच्या प्रयत्नांचे कौतुक केले. सहाय्यक प्रा. हेतल यांनी अतिथी परिचय करून दिला, ज्यांनी आदरणीय संसाधन व्यक्ती, माननीय न्यायाधीश श्रीमती लता सकपाळ, न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, बाल न्याय मंडळ, पुणे यांची ओळख करून दिली. त्यांनी संसाधन व्यक्तीच्या प्रतिष्ठित कारकिर्दी, न्यायिक अनुभव आणि कौशल्याबद्दल सविस्तरपणे सांगितले, ज्यामुळे सत्रासाठी प्रेरणादायी वातावरण निर्माण झाले.



तांत्रिक सत्राचे संचालन माननीय न्यायाधीश श्रीमती लता सकपाळ यांनी केले. त्यांनी जेएमएफसी परीक्षा पद्धती, अभ्यासक्रम, तयारी धोरणे, वेळ व्यवस्थापन, उत्तर लेखन तंत्रे आणि न्यायालयीन कामकाजाच्या व्यावहारिक पैलूंबद्दल मौल्यवान अंतर्दृष्टी प्रदान केली. त्यांनी त्यांचे वैयक्तिक अनुभव, तयारी दरम्यान येणाऱ्या आव्हाने आणि इच्छुकांसाठी व्यावहारिक टिप्स देखील शेअर केल्या. सत्र अत्यंत परस्परसंवादी होते आणि विद्यार्थ्यांनी परीक्षेची तयारी आणि न्यायालयीन

कारकिर्दीशी संबंधित प्रश्न विचारून सक्रिय सहभाग घेतला.

कार्यशाळेचा समारोप आभार प्रदर्शनाने झाला, ज्यामध्ये संसाधन व्यक्ती, प्राचार्य, प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांनी त्यांच्या सक्रिय सहभागाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. कार्यक्रमाचे समन्वय सहाय्यक प्रा. शिवाजी बिबे आणि सहाय्यक प्रा. प्रेरणा वसावे यांनी केले. जेएमएफसी परीक्षेला बसू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी ही कार्यशाळा अत्यंत माहितीपूर्ण, प्रेरणादायी आणि फायदेशीर ठरली.

१७ डिसेंबर रोजी मुंबई विद्यापीठाने दुसऱ्या आणि चौथ्या सत्रातील एटीकेटीचे निकाल जाहीर केले.

एलएलएम द्वितीय वर्षाच्या प्रवेशाला २६ डिसेंबर २०२५ रोजी सुरुवात झाली. आतापर्यंत प्रवेश पूर्ण झाले आहेत. वर्ग ९ जानेवारी २०२५ रोजी सुरू होणार आहेत.

विद्यापीठाने इब्सार महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या पात्रतेचे निराकरण करण्यासाठी क्रिटिकल कमिटीमध्ये डॉ. श्रीविद्या जयकुमार यांची नियुक्ती केली होती. समितीने काम पूर्ण केले आणि अहवाल सादर केला.

१८ डिसेंबर २०२५ रोजी प्राचार्य डॉ. श्रीविद्या जयकुमार यांनी मध्यस्थी प्रमाणपत्र कार्यक्रमासाठी अधिवक्ता श्रीमती तनु मेहता यांच्याशी बैठक घेतली.

महाविद्यालयातील २०१६ च्या बॅचचे माजी विद्यार्थी श्री. रमेश आडगाळे यांची प्रशिक्षणानंतर नाशिक येथे दिवाणी न्यायाधीश व प्रथम वर्ग न्यायिक दंडाधिकारी म्हणून नियुक्ती झाली आहे. पुढील वाटचाली साठी शुभेच्छा!



## डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था

१ डिसेंबर २०२५: डॉ. नीतिन जोशी यांना एम. ई.टी. तर्फे त्यांच्या आरएसी (RAC) समितीसाठी सदस्य म्हणून सामील होण्यासाठी आमंत्रित करण्यात आले.

२ डिसेंबर २०२५: भारत सरकारच्या शिक्षण मंत्रालयाच्या इनोव्हेशन सेलद्वारे मुंबई येथील द्वारकादास जे. संघवी अभियांत्रिकी महाविद्यालयात 'आयआयसी प्रादेशिक बैठक २०२५' चे आयोजन करण्यात आले आणि त्या मध्ये ब्रिम्स च्या सहायक प्रा. डॉ. विभूती ठाकूर-सावे यांना सर्वोत्कृष्ट इनोव्हेशन ॲम्बेसेडर म्हणून सन्मानित करण्यात आले. ५० हून अधिक इनोव्हेशन ॲम्बेसेडरपैकी केवळ ४ जणांना सर्वोत्कृष्ट इनोव्हेशन ॲम्बेसेडर म्हणून पुरस्कारित करण्यात आले आणि डॉ. विभूती सावे या त्या ४ सर्वोत्कृष्ट इनोव्हेशन ॲम्बेसेडरपैकी एक आहेत.




IIC Regional Meet 2025

२ डिसेंबर २०२५: श्री. संजय सपकाळ यांनी देखील ब्रिम्स च्या आय आय सी समितीचे सदस्य म्हणून या आयआयसी प्रादेशिक बैठकीत सहभाग घेतला.


IIC Regional Meet 2025
MoE's Innovation Cell
Institutions' Innovation Council, AICTE
Certificate of Participation
This is certify that
Sanjay Sapkal
Has attended the One Day Regional Meet hosted by Shri Vile Parle Kelavani Mandal's Dwarkadas J. Sanghvi College of Engineering, Mumbai on 2nd December 2025
Prof. T. G. Sitharam
Dr Dipan Sahu

४ डिसेंबर, २०२५ : डॉ. व्ही.एन. ब्रिम्स तर्फे पाणिनी सभागृहात वार्षिक सांस्कृतिक कार्यक्रम स्वरांजली – डिसेंबर २०२५' चे आयोजन करण्यात आले. विद्यार्थी, प्राध्यापक आणि कर्मचारी सदस्यांनी या कार्यक्रमात उत्साहाने भाग घेतला आणि आपली प्रतिभा सादर केली. या प्रसंगी जुनी आणि नवीन गाणी, बीट बॉक्सिंग, युकुलेले वादन, वाद्यवृंद–'राग– रीदम' यांसारखे विविध संगीत कार्यक्रम सादर करण्यात आले. विद्यार्थी विकास समितीच्या वतीने डॉ. कांचन अक्षय आणि सहाय्यक प्रा. सिद्धेश सोमण यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले.



५ डिसेंबर २०२५: डॉ. स्मिता जपे, डॉ. पल्लवी चंदवास्कर, डॉ. विभूती सावे, डॉ. मयुरा पाटील आणि ब्रिम्सचे विद्यार्थी; 'उद्योगावर बोलू काही!' या; डॉ. सुरेश हावरे (अणुशास्त्रज्ञ आणि हावरे बिल्डर्सचे व्यवस्थापकीय संचालक) यांनी आयोजित केलेल्या कार्यक्रमात सहभागी झाले.

या सत्रात मराठी उद्योजकांच्या प्रवासाविषयी – त्यांच्या यशोगाथा, आव्हाने आणि संकट व्यवस्थापन धोरणांविषयी – महत्त्वपूर्ण माहिती मिळाली. हे एक प्रेरणादायी आणि विचारप्रवर्तक सत्र होते.







६ डिसेंबर २०२५ : सहाय्यक प्राध्यापक प्रथमेश उ. तावडे यांनी १ ते ६ डिसेंबर २०२५ दरम्यान आय आय एम, बंगलोर (IIMB) हिवाळी संशोधन पद्धती कार्यशाळा २०२५ मध्ये सहभाग घेतला.

९ डिसेंबर २०२५: ब्रिम्सच्या सीएसआर समितीने एचडीएफसी बँकेच्या सीएसआर विभागाच्या सहकार्याने रक्तदान शिबिर आयोजित केले. या शिबिरात ३६ पेक्षा जास्त रक्तदात्यांनी रक्तदान केले.



९ डिसेंबर २०२५ : डॉ. नीतिन जोशी यांना एलआयसी समिती सदस्यत्वासाठी व्हि. आय. एस. इ. एम. (VISEM) तर्फे आमंत्रित करण्यात आले.

१० डिसेंबर २०२५ : डॉ. पल्लवी चंदवास्कर आणि डॉ. विभूती सावे यांनी उद्योग–शैक्षणिक संवाद उपक्रमांतर्गत संभाव्य सहकार्याच्या संधी शोधण्यासाठी 'अनुवी

केमिकल्स लिमिटेड'ला भेट दिली आणि 'अनुवी लीडरशिप चॅलेंज' या विद्यार्थ्यांसाठी आयोजित केल्या जाणाऱ्या उद्योग-आधारित समस्या-निवारण स्पर्धेसाठी यशस्वीपणे प्रायोजकत्व मिळवले,



यामध्ये बक्षिसे आणि विद्यार्थ्यांसाठी इंटर्नशिपची संधी उपलब्ध आहे.

१० डिसेंबर २०२५: डॉ. नीतिन जोशी यांना मुंबई विद्यापीठाच्या कॉनकोल विभागाद्वारे समतुल्यता समितीचे सदस्य म्हणून आमंत्रित करण्यात आले.

१४ डिसेंबर २०२५: डॉ. नीतिन जोशी यांनी ईपी-एमबीए विद्यार्थ्यांसाठी 'अनलॉकिंग द हिडन पोटेन्शिअल' या विषयावर एक सत्र आयोजित केले.

१५ डिसेंबर २०२५: सहाय्यक प्राध्यापिका अदिती दामले-पवार, सहाय्यक प्राध्यापक प्रथमेश उ. तावडे, सहाय्यक प्राध्यापक विशाल वेदक आणि डॉ. कृष्णकांत लसुणे यांनी लिहिलेली 'द कलर्स ऑफ चेंज: क्वालिटी पेंट्स - ब्लेंडिंग इन्क्लुसिव्हनेस अँड सस्टेनेबिलिटी' ही केस स्टडी HBR (हार्वर्ड बिजनेस रिव्हिव्हयू) प्रकाशन प्लॅटफॉर्मवर प्रकाशित झाली.




३० डिसेंबर २०२५: डॉ. स्मिता जपे यांना 'जर्नल ऑफ सायंटिफिक रिसर्च अँड रिपोर्ट्स' तर्फे 'मध्य प्रदेशातील महिला सक्षमीकरणावर सूक्ष्मवित्तपुरवठ्याची भूमिका: सिहोर जिल्ह्याच्या विशेष संदर्भात' या शीर्षकाच्या शोधनिबंधाचे समीक्षण करण्यासाठी आमंत्रित करण्यात आले.

## महर्षी परशुराम अभियांत्रिकी महाविद्यालय, वेळणेश्वर

दिनांक २७ सप्टेंबर २०२५ रोजी 'प्रकल्प २०२५ या आंतरमहाविद्यालयीन प्रोजेक्ट स्पर्धेची' यशस्वी सांगता झाली. रत्नागिरी जिल्ह्यातील अकरावी व बारावी विज्ञान शाखेच्या विविध कनिष्ठ महाविद्यालयांतील सुमारे ३० गटांनी या स्पर्धेत उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. विद्यार्थ्यांमध्ये Physics, Chemistry व Biology विषयांबाबत वैज्ञानिक दृष्टिकोन, प्रात्यक्षिक ज्ञान आणि नवकल्पनांची आवड निर्माण करणे हा स्पर्धेचा मुख्य उद्देश होता. स्पर्धा दोन टप्प्यांत पार पडली असून अंतिम फेरीसाठी निवडलेल्या गटांनी महाविद्यालयात आपले प्रकल्प प्रभावीपणे सादर केले. अंतिम फेरीत जिंदाल विद्यामंदिर येथील प्रथमेश ठाकूर व ग्रुप यांनी 'Artificial Intelligence सुरक्षितता' या विषयावरील प्रकल्पासाठी प्रथम क्रमांक, श्रीदेव गोपाळकृष्ण माध्यमिक विद्यामंदिर, गुहागर यांनी द्वितीय क्रमांक, तर नवभारत ज्युनियर कॉलेज, खेड यांनी Plastic Vending Machine प्रकल्पासाठी तृतीय क्रमांक पटकावला. विजेत्यांना रोख पारितोषिके व प्रशस्तीपत्रके देऊन सन्मानित करण्यात आले. या उपक्रमासाठी विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ. विजय बेडेकर, प्राचार्य श्री. अविनाश पवार, तसेच कार्यक्रम समन्वयक डॉ. गणेश दिवे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. या स्पर्धेमुळे विद्यार्थ्यांमधील वैज्ञानिक विचारसरणी व सर्जनशीलतेला प्रभावी चालना मिळाली.



महर्षी परशुराम अभियांत्रिकी महाविद्यालय, वेळणेश्वर येथील नाना फडणवीस सभागृहात शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये प्रथम वर्ष व थेट द्वितीय वर्ष अभियांत्रिकी अभ्यासक्रमात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी विशेष मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांना अभ्यासासोबतच संशोधन, नवकल्पना आणि व्यक्तिमत्व विकासाची दिशा मिळावी, हा या कार्यक्रमामागील प्रमुख हेतू होता. कार्यक्रमात मार्गदर्शन करताना वक्त्यांनी भारताच्या संशोधन क्षेत्रातील वाटचालीवर प्रकाश टाकला. भाभा अणुसंशोधन केंद्रासारख्या संस्थांमुळे भारत संशोधनात सक्षम असल्याचे नमूद करत, विद्यार्थ्यांनी अभियांत्रिकी शिक्षणाकडे केवळ नोकरीच्या दृष्टीने न पाहता नवे प्रयोग, संशोधन व उद्योजकतेकडे वळावे, असे आवाहन करण्यात आले. सातत्यपूर्ण कष्ट आणि जिद्द यांशिवाय यश मिळत नाही, याचीही जाणीव करून देण्यात आली. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी महाविद्यालयात कार्यरत ज्येष्ठ शास्त्रज्ञ समितीच्या माध्यमातून दर सेमिस्टरला विविध विषयांवर व्याख्याने आयोजित केली जात असल्याचे यावेळी सांगण्यात आले. कार्यक्रमात लघुचित्रफित सादरीकरण, प्राचार्य व समिती सदस्यांची मनोगते, तसेच आजी-माजी विद्यार्थी आणि पालकांचे अनुभव कथन हे विशेष आकर्षण ठरले. पालशेत येथील रवींद्र कानिटकर यांनी ज्येष्ठ शास्त्रज्ञ समितीच्या उपक्रमांचे कौतुक करत, आपल्या मुलाला मिळालेल्या यशस्वी प्लेसमेंटबाबत समाधान व्यक्त केले. हा मार्गदर्शन कार्यक्रम विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी आणि दिशादर्शक ठरला.

दिनांक ६ ऑक्टोबर २०२५ रोजी महाविद्यालयातील मेकॅनिकल अभियांत्रिकी विभागाच्या प्रा.नयना फणसे यांनी राजाराम शिंदे इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी अॅन्ड इंजिनीयरिंग, पेढांबे इथे व्याख्यान दिले. Emerging technologies and innovations in mechanical engineering हा या व्याख्यानाचा विषय होता. एकूण ५५ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला.




दिनांक १० ऑक्टोबर २०२५ रोजी ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभागाच्या वतीने वादविवाद स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेत महाविद्यालयातील तृतीय व चतुर्थ वर्ष अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत आपली विचारमांडणी व वक्तृत्वकला प्रभावीपणे सादर केली. स्पर्धेत कु. तनुजा आंबेकर (चतुर्थ वर्ष, विद्युत अभियांत्रिकी) हिने प्रथम क्रमांक, कु. शंतनू गुरव (तृतीय वर्ष, संगणक अभियांत्रिकी) याने द्वितीय क्रमांक, तर कु. यश पेडणेकर (तृतीय वर्ष, यांत्रिक अभियांत्रिकी) याने तृतीय क्रमांक पटकावला. स्पर्धेसाठी श्री. सतीश घोरपडे आणि डॉ. गणेश दिवे यांनी परीक्षक म्हणून काम पाहत विद्यार्थ्यांना मौलिक मार्गदर्शन केले. महाविद्यालयाचे प्राचार्य श्री. अविनाश पवार यांनी विजेत्यांचे अभिनंदन करत अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास व संवादकौशल्य विकसित होत असल्याचे नमूद केले. स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभागाचे श्री. हृषीकेश भावे व त्यांच्या टीमने विशेष परिश्रम घेतले.




दि. १५ ऑक्टोबर २०२५ रोजी मध्यवर्ती ग्रंथालय विभागाच्या वतीने माजी राष्ट्रपती डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त 'वाचन प्रेरणा दिन' उत्साहात साजरा करण्यात आला. हा कार्यक्रम श्रीपती इमारतीतील संगणक केंद्रात पार पडला. कार्यक्रमाच्या प्रारंभी डॉ. कलाम व सरस्वती देवीच्या प्रतिमांचे पूजन व दीपप्रज्वलन करण्यात आले. प्रमुख व्याख्याते म्हणून डॉ. गणेश दिवे, तर अध्यक्षस्थानी प्राचार्य श्री. अविनाश पवार उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी भाषण, सादरीकरण व वाचनविषयक अनुभव कथनातून कार्यक्रमात उत्स्फूर्त सहभाग घेतला. मुख्य व्याख्यानात डॉ. गणेश दिवे यांनी वाचनाचे शैक्षणिक, वैचारिक व व्यक्तिमत्त्व विकासातील महत्त्व अधोरेखित केले. अध्यक्षीय भाषणात प्राचार्य अविनाश पवार यांनी डॉ. कलाम यांच्या जीवनातून प्रेरणा घेऊन वाचन, विचार व कृती यांचा समन्वय साधण्याचे आवाहन केले.




दिनांक २१ ऑक्टोबर २०२५ रोजी महाविद्यालयातील मेकॅनिकल अभियांत्रिकी विभागाच्या प्रा.राहुल कुंडिया, प्रा.स्वानंद जोशी, प्रा.नयना फणसे आणि प्रा.हृषिकेश भावे यांचे united kingdom UK पेटंट मंजूर झाले. Infant Carrier हे पेटंटचे शीर्षक आहे. ६४७८२५५० हा पेटंटचा डिझाईन नंबर आहे.


Intellectual Property Office

Certificate of Registration for a UK Design

Grant date: 21 October 2025

Registration date: 08 October 2025

This is to certify that,

in pursuance of and subject to the provision of Registered Designs Act 1949, the design of which a representation or specimen is attached, had been registered as of the date of registration shown above in the name of

Rahul Raju Kundiya, Ketan Kundiya, Swanand Joshi, Nayana Phanse,

Hrishikesh Bhave, Gajanan Khapre, Vinod Salunkhe, Radhika Kadam

in respect of the application of such design to:

Infant carrier

International Design Classification:
Version: 15-2025
Class: 03 TRAVEL GOODS, CASES, PARASOLS AND PERSONAL BELONGINGS, NOT ELSEWHERE SPECIFIED
Sub-class: 05 DEVICES FOR CARRYING AND WALKING WITH BABIES AND CHILDREN

Adam Williams
Comptroller-General of Patents, Designs and Trade Marks
Intellectual Property Office
The attention of the Proprietor(s) is drawn to the important notes overleaf

दिनांक १३ नोव्हेंबर २०२५ रोजी Applied Science and Humanities department आणि Institutions Innovation Council यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय शिक्षण दिवसाच्या निमित्ताने व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. या व्याख्यानासाठी आपल्या महाविद्यालयाचे ग्रंथपाल डॉ. संतोष चतुर्भुज व्याख्याते म्हणून लाभले होते. डॉ. संतोष चतुर्भुज यांनी शिक्षणाचे सामाजिक, वैयक्तिक व राष्ट्रीय विकासातील महत्त्व स्पष्ट केले. राष्ट्रीय शिक्षण दिनाचे महत्त्व, भारतरत्न मौलाना अबुल कलाम आझाद यांच्या शिक्षणक्षेत्रातील योगदानाचा थोडक्यात आढावा घेतला. आधुनिक काळातील शिक्षणाची गरज, ग्रंथालयाचे बदलते स्वरूप, डिजिटल युगातील माहितीचे व्यवस्थापन, तसेच विद्यार्थ्यांनी वाचन संस्कृती जोपासण्याची आवश्यकता यावर त्यांनी सविस्तर मार्गदर्शन केले.त्यांनी विद्यार्थ्यांना उपलब्ध ई-रेसर्सेस, रेफरन्स मटेरिअल्स, संशोधनासाठी उपयोगी डेटाबेस आणि ग्रंथालयातील विविध सुविधांची ओळख करून दिली. तसेच जीवनभर शिक्षण (Lifelong Learning) या संकल्पनेचे महत्त्व त्यांनी अतिशय प्रभावीपणे मांडले.



दि.१४ नोव्हेंबर २०२५ रोजी महाविद्यालयातील प्रथम वर्ष अभियांत्रिकी विभाग व Institutions Innovation Council यांच्या संयुक्त विद्यमाने AI and I4.0 Tools for Innovators and Entrepreneurs या विषयावर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेसाठी Quality Persistent System Pvt. Ltd. येथील Senior Engineer Lea व मानसी गोरे या प्रमुख व्याख्यात्या म्हणून उपस्थित होत्या. कार्यशाळेत त्यांनी Industry 4.0 मध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) ची भूमिका स्पष्ट करत Machine Learning, Data -nalytics, IoT, -utomation, Digital Twins आणि Cloud Computing यांचा उद्योजकतेतील उपयोग समजावून सांगितला. नवउद्योजकांसाठी उपलब्ध AI आधारित साधनांचे प्रात्यक्षिक करून Problem Identification, Prototyping, Market Analysis, Smart Manufacturing व Customer Analysis याबाबत मार्गदर्शन केले. या कार्यशाळेमुळे विद्यार्थ्यांमध्ये नवकल्पना, उद्योजकता व आधुनिक तंत्रज्ञान स्वीकारण्याबाबत जागरूकता निर्माण झाली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. अमित जोशी (प्रथम वर्ष अभियांत्रिकी विभाग) यांनी केले.

दिनांक २० नोव्हेंबर २०२५ महाविद्यालयातील प्रथम वर्ष अभियांत्रिकी विद्यार्थांची शैक्षणिक औद्योगिक भेट आयोजित करण्यात आली. या भेटीचा उद्देश विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष औद्योगिक प्रक्रिया, उत्पादन तंत्रज्ञान व गुणवत्ता नियंत्रणाची माहिती देणे हा होता. या भेटीदरम्यान विद्यार्थ्यांनी Washishti Milk and Milk Products Pvt. Ltd., Shivsmruti Millets Processing Unit आणि Mundhar Bakery and Food Pvt. Ltd. (Water Cold Drink Unit) या तीन स्थानिक उद्योगांना भेट दिली. एकूण १८ विद्यार्थी, तसेच प्रा. औदुंबर पाटकर, सौ. राधिका कदम व श्री. संभाजी लोहार यांनी या भेटीत सहभाग घेतला. विद्यार्थ्यांना दूध प्रक्रिया, मिलेट्स प्रक्रिया, तसेच पिण्याचे पाणी व शीतपेय उत्पादनातील विविध टप्पे प्रत्यक्ष पाहण्याची संधी मिळाली. ही औद्योगिक भेट विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त ठरली असून औद्योगिक तंत्रज्ञान व उद्योजकतेबाबतची त्यांची समज अधिक दृढ झाली.



दिनांक ३० नोव्हेंबर २०२५ रोजी विद्या प्रसारक मंडळाच्या ९० व्या वर्धापनदिनानिमित्त विद्यायतन आयोजित भव्य कार्यक्रमात महर्षी परशुराम अभियांत्रिकी महाविद्यालय, वेळणेश्वर येथील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी उपस्थित राहून मंडळास शुभेच्छा दिल्या.




दिनांक ०२ डिसेंबर २०२५ रोजी महाविद्यालयातील मेकॅनिकल अभियांत्रिकी विभागातील तृतीय वर्षाचा विद्यार्थी कु. यश पेडणेकर याने IIC Regional Meet अंतर्गत आयोजित Yukti Innovation Challenge तसेच AICTE Productization Fellowship यांच्या सऱ्या फेरीत आपले प्रेझेंटेशन सादर केले. ही स्पर्धा D. J. Sanghavi College of Engineering, विलेपार्ले (मुंबई) येथे पार पडली. कु. यश पेडणेकर यांनी या स्पर्धेत महाविद्यालयाचे प्रतिनिधित्व करत आपली नवोन्मेषक क्षमता आणि सादरीकरण कौशल्य प्रभावीपणे मांडले.




दिनांक १० डिसेंबर २०२५ रोजी महाविद्यालयातील मेकॅनिकल अभियांत्रिकी विभागातील कु.आर्यन धुमक आणि कु. यश पेडणेकर या तृतीय वर्षाच्या दोन विद्यार्थ्यांनी मुंबई विद्यापीठाच्या 'Aavishkar Research Convention' या संशोधन स्पर्धेत सहभाग नोंदवला. ही स्पर्धा A. P. Shaha College of Engineering, ठाणे येथे पार पडली. झोनल फेरीत दोन्ही विद्यार्थ्यांनी पहिला राऊंड यशस्वीपणे पार करून दुसऱ्या राऊंडमध्ये प्रवेश मिळवला. संशोधनात्मक दृष्टीकोन व सादरीकरण कौशल्यामुळे त्यांची कामगिरी उल्लेखनीय ठरली. या सहभागामुळे विद्यार्थ्यांच्या संशोधनवृत्तीला चालना मिळाली असून महाविद्यालयासाठी ही अभिमानाची बाब आहे.



दिनांक १७ डिसेंबर २०२५ रोजी महाविद्यालयातील मेकॅनिकल अभियांत्रिकी विभागातील प्रा.राहुल कुंडीया यांनी खेड तालुक्यातील बेहेरे महाविद्यालय, लवेल; ज्ञानदीप महाविद्यालय, बोरज; तसेच शेठ चंदुलाल ओटलमाल महाविद्यालय, खेड येथे भेट देऊन Career in Mechanical Engineering या विषयावर मार्गदर्शनपर व्याख्याने दिली. या व्याख्यानांद्वारे १०० हून अधिक विद्यार्थ्यांना मेकॅनिकल अभियांत्रिकीतील करिअरच्या संधी, उच्च शिक्षण, उद्योगातील विविध क्षेत्रे व आवश्यक कौशल्यांबाबत उपयुक्त माहिती देण्यात आली. विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने सहभाग नोंदवून आपल्या शंकांचे समाधान करून घेतले.



महाविद्यालयातील इन्स्ट्रुमेंटेशन अभियांत्रिकी विभाग, आयएसओआय व आयआयसी यांच्या संयुक्त विद्यमाने इन्स्ट्रुमेंटेशन शाखेतील बदलत्या तंत्रज्ञानातील करिअरच्या अपार संधी या विषयावर तज्ज्ञ व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमासाठी OGM Engineering Pvt. Ltd. चे प्रोजेक्ट्स व ऑपरेशन्स संचालक श्री. गौतम माळी हे प्रमुख संसाधन व्यक्ती म्हणून उपस्थित होते. त्यांनी इन्स्ट्रुमेंटेशन अभियांत्रिकी क्षेत्रातील करिअरच्या संधी, उद्योगातील नव्या तंत्रज्ञानाची ओळख, तसेच विद्यार्थ्यांनी आत्मसात करावयाच्या आवश्यक कौशल्यांवर सविस्तर मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांना उद्योगातील आव्हाने व त्यावरील उपाय यांची उपयुक्त माहिती मिळाली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत प्रा. प्रतिक्षा पाटील यांनी केले. यावेळी प्राचार्य प्रा. अविनाश पवार, विभागप्रमुख, प्राध्यापक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यार्थ्यांनी केले व आभार प्रदर्शन करण्यात आले.

महर्षी परशुराम अभियांत्रिकी महाविद्यालय, वेळणेश्वर यांनी IIC Regional Meet २०२५ मध्ये उल्लेखनीय यश संपादन करत राज्यातील अग्रगण्य महाविद्यालयांमध्ये आपले स्थान पक्के केले. महाराष्ट्रातील सुमारे ५० प्रतिष्ठित अभियांत्रिकी व विज्ञान महाविद्यालयांच्या पोस्टर सादरीकरण स्पर्धेत महाविद्यालयाने अव्वल

पाचमध्ये स्थान मिळवले. प्रकल्प IIC (Institution of Innovation Council) आयोजित या रिजनल मीटमध्ये नवोपक्रम, सर्जनशीलता, स्टार्टअप संस्कृती आणि सादरीकरण कौशल्याच्या आधारे स्पर्धा घेण्यात आली. पोस्टरचे मूल्यमापन नवकल्पना, डिझाईनची गुणवत्ता, संशोधनाची खोली आणि सादरीकरणातील स्पष्टता या निकषांवर करण्यात आले. अंतिम पाच महाविद्यालयांमध्ये महर्षी परशुराम अभियांत्रिकी महाविद्यालयासह IIT बॉम्बे, FR Conceimçã Rodrigues College of Engineering (बांद्रा), SIES College (सायन), भारती विद्यापीठ भवन व सरदार पटेल इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी यांचा समावेश होता. सादर केलेल्या पोस्टरच्या नावीन्यपूर्ण मांडणी व आकर्षक डिझाइनसाठी श्री. संजीव राहटे यांचे विशेष कौतुक करण्यात आले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अविनाश पवार यांनी IIC टीमचे अभिनंदन करत नवोपक्रम, संशोधनवृत्ती व उद्योजकतेला चालना देणाऱ्या उपक्रमांना महाविद्यालय सातत्याने प्रोत्साहन देत राहील, असे प्रतिपादन केले. या यशामुळे महाविद्यालयाची राज्यस्तरीय ओळख अधिक भक्कम झाल्याचे त्यांनी नमूद केले.

महर्षी परशुराम अभियांत्रिकी महाविद्यालय, वेळणेश्वर येथील इन्स्ट्रुमेंटेशन अभियांत्रिकी विभागातील बी.ई. अंतिम वर्षाचा विद्यार्थी श्री. नितेश मोकल यांची आयआयटी मुंबई येथील प्रतिष्ठित रिसर्च इंटर्नशिपसाठी निवड झाल्याची आनंददायी बातमी आहे. संशोधनातील त्यांची सातत्यपूर्ण रुची, शैक्षणिक प्रगती आणि तांत्रिक कौशल्य यांच्या बळावर ही संधी त्यांना मिळाली असून, आयआयटी मुंबईसारख्या नामांकित संस्थेमध्ये इंटर्नशिपसाठी निवड होणे ही महाविद्यालयासाठी अभिमानाची बाब आहे. या उल्लेखनीय यशाबद्दल विद्या प्रसारक मंडळाचे सेक्रेटरी श्री. अभय मराठे, ज्येष्ठ सदस्य श्री. जयंत कयाळ, तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अविनाश पवार यांनी श्री. नितेश मोकल यांचे मनःपूर्वक अभिनंदन करून त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा व्यक्त केल्या.

विद्या प्रसारक मंडळ संचालित महर्षी परशुराम अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अविनाश पवार यांनी लोणेरे येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठातून PhD पदवी मिळवून महाविद्यालयाचा मान अधिक उंचावला आहे. त्यांच्या या यशाने संस्थेच्या शैक्षणिक परंपरेत नवी भर पडली आहे. आपल्या विद्यावाचस्पती अभ्यासात डॉ. पवार यांनी हापूस आंब्याच्या पानांच्या परिस्थिती वरून वेगवेगळ्या दहा प्रकारचे रोग ओळखू शकणारे अत्याधुनिक कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) आधारित मॉडेल विकसित केले आहे. या मॉडेलमुळे शेतकऱ्यांना आंब्याच्या झाडांवरील रोग लवकर, अचूक आणि वैज्ञानिक पद्धतीने निदान करणे शक्य होणार असून, योग्य उपचाराची वेळेवर अंमलबजावणी करून उत्पादनात उल्लेखनीय वाढ साधता येणार आहे. त्यांच्या संशोधनामुळे कृषीक्षेत्रात तंत्रज्ञानाच्या नव्या शक्यता निर्माण झाल्या असून, आंबा उत्पादनात डिजिटायझेशनचा नवा अध्याय सुरू झाल्याचे तज्ज्ञांचे मत आहे. डॉ. पवार यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल विद्या प्रसारक मंडळाचे कार्याध्यक्ष डॉ. विजय बेडेकर तसेच पदाधिकारी व प्राध्यापकवर्ग यांनी त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन करून पुढील शैक्षणिक व संशोधन वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.



**Posting under the Reg. No. MH/MR/TNC-27/2004-2006**



# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

- ❉ अत्याधुनिक दृक् श्राव्य यंत्रणा
- ❉ वातानुकूलित प्रसन्न वातावरण
- ❉ वाहने उभी करण्यासाठी प्रशस्त जागा

अशा सुविधांनी युक्त

| **सभागृहाचे नाव** | **ठिकाण** | **आसन क्षमता** |
|---|---|---|
| थोरले बाजीराव पेशवे सभागृह | महाविद्यालय परिसर | ३०० |
| कात्यायन सभागृह | कला/वाणिज्य इमारत | १६० |
| पातंजली सभागृह | बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय इमारत | १६० |
| पाणिनी सभागृह | डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था इमारत | १८० |
| मनु सभागृह | वि. प्र. मं. चे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय इमारत | २५० |

**❉ संपर्क ❉**

कार्यवाह

## विद्या प्रसारक मंडळ

विष्णूनगर, नौपाडा, ठाणे - ४०० ६०२

दूरध्वनी क्रमांक - २५४२६२७०

Email : vpmt1935@gmail.com

हे मासिक प्रकाशक आणि संपादक डॉ. विजय वासुदेव बेडेकर व मुद्रक श्री. विलास सांगुर्डेकर, परफेक्ट प्रिण्टस्, नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे - ४०० ६०१ या मुद्रणालयामध्ये छापून विद्या प्रसारक मंडळ, जिल्हा ठाणे-४०० ६०२ यांच्याकरिता विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, विष्णूनगर, ठाणे - ४०० ६०२ इथून प्रकाशित केले.